दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –६९ | शुक्रवार दि.१४ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-69 | Friday, Dt.14 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# देशात हुकमी एक्का म्हणून भाजपा स्थीर होत असताना मुंडेंच्या बालेकिल्लात मात्र दिशाहीन ?

## भाजपाचे नेतृत्व विचलित असल्याने कार्यकर्ते झाले वंचित..!

**बीड / वैभव स्वामी**

पुरोगामी विचारांचे वर्चस्व असलेल्या बीड जिल्ह्यावर लोकनेते गोपीनाथराव मुंडे या नेतृत्वाने हा जिल्हा काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या जबड्यातून काढत कधी भाजपमय केला हे राज्याच्या दिग्गज नेत्यांना सुद्धा कधी लक्षात आले नाही.आज त्याच मुंडेंच्या बालेकिल्लामध्ये नेतृत्व विचलित असल्यामुळे भाजपाचा हा बालेकिल्ला पुन्हा एकदा राष्ट्रवादीमय जवळपास झाला आहे. बीड जिल्ह्यावर राष्ट्रवादीचे वर्चस्व सिद्ध झाल्याचे लोकसभा आणि विधानसभेत स्पष्ट झाले आहे.आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत त्यावर आणखीन शिक्कामोर्तब होईल अशीच परिस्थिती भाजपाच्या स्थानिक दिशाहीन नेतृत्वामुळे निर्माण झाली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये पूर्वी पश्चिम महाराष्ट्राचे राजकीय वर्चस्व होते.पवार साहेब जे ठरवतील तेच बीड जिल्ह्याच्या राजकारणात घडत होते. बीड जिल्ह्यातील

(उर्वरीत पान २ वर)

**1 मुंडे साहेबांनी वैद्यनाथ कारखाना आपले अपत्य म्हणून जपला आणि २३ कारखाने सक्षम चालवले पण ताईसाहेब तुम्ही....?**


ऊसतोड मजुरांचा देखील साखर कारखाना होऊ शकतो हे पश्चिम महाराष्ट्रासह उभ्या देशाला स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी वैद्यनाथ कारखान्याची निर्मिती करून दाखवले. वैद्यनाथ कारखान्याला आपले चौथे अपत्य समजून त्यांनी त्याला जपले. एवढेच नव्हे ज्यांनी मुंडे साहेबांना कारखाना चालवणं एवढं सोपं नाही म्हणून हिणवलं त्याच मुंडे साहेबांनी महाराष्ट्रातील २३ सहकारी साखर कारखाने सक्षमपणे चालवले आणि इतिहास घडवला. पण मुंडे साहेबांच्या पश्चात ताईसाहेब २३ सोडा एक वैद्यनाथ कारखाना सुद्धा आपल्याला सक्षमपणे चालवता आला नाही. हे अपयश नेमकं कोणाचं..?

**2 भाजपा आणि ताई साहेबांना सोडून जाणारे एक नव्हे.. शेकडो नव्हे.. हजारो...?**

केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता असताना सुद्धा भारतीय जनता पार्टी आणि पंकजाताई मुंडे या मंत्री असताना सुद्धा त्यांचे नेतृत्व सोडून बीड जिल्ह्यातील मातब्बर नेते इतर पक्षात जात आहेत. एक सोडून गेला... दोन सोडून गेले... चार सोडून गेले....दहा सोडून गेले...२५ सोडून गेले तर आपण समजू शकतो. मात्र जेव्हा ही संख्या तुलनात्मक दृष्ट्या कित्येक पटीने वाढायला लागते तेव्हा नेतृत्वाने आपल्यातील उणिवा शोधून त्यात सुधारणा करणे काळाची गरज बनते. अन्यथा आगामी राजकीय भवितव्य अंधकारमय झाल्याशिवाय राहणार नाही, हे सत्य स्वीकारावे लागेल.

**3 मुंडे साहेबांचे मातब्बर एक एक शिलेदार हळूहळू का निघून गेले..?**

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यासाठी जीवाला जीव देणारे पक्षातले आणि पक्षांतर्गत सोडून पक्षा बाहेरील अनेक दिग्गज नेते मुंडे साहेबांच्या नंतर पंकजाताई मुंडे या नेतृत्वाला उभारी देण्यामध्ये, ताईंना ताकद देण्यामध्ये पुढे सरसावले होते. मात्र हळूहळू हे सर्व हुकमी एक्के असलेले शिलेदार एक एक करत पक्षातून आणि ताईसाहेब आपल्याला सोडून गेले याचे आत्मचिंतन कधी करणार आहात का..?



### स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडले... ?

बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली आहे. या सहा नगरपालिका निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीचे अस्तित्व अबाधित ठेवण्यासाठी आपल्या कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी पंकजाताईंनी अपवाद वगळता एकही बैठक लावली नाही. आपल्या घटक पक्षातील, महायुतीतील पक्ष नेतृत्वाशी संपर्क करून आपल्या कार्यकर्त्याला उमेदवारी देणे, त्यांना निवडून आणण्यासाठी बळ देणे हे दुर्दैवाने आजपर्यंत केले नाही.स्थानिक भाजपाचे नेतृत्वच आपले अस्तित्व टिकवण्यासाठी निवडणुकीच्या रिंगणामध्ये नाविलाजास्त उतरले आहेत. ही परिस्थिती आज नगरपालिकेमध्ये झाली आहे. बोटावर मोजण्या एवढे उमेदवार आणि नगराध्यक्ष निवडून येतील ही पण त्यापैकी ताईसाहेब आपल्याला मानणारे किती असतील ? याबद्दल निश्चितच शंका आहे. अवघ्या काही दिवसात स्थानिक स्वराज्य संस्थेतील दुसरा टप्पा म्हणजेच जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुका होणार आहेत. या निवडणुकीत तर ताईसाहेब आपल्या नेतृत्वाखालील भाजपाला तुल्यबळ उमेदवार तरी मिळतील का ? अशी परिस्थिती आजच झाली आहे याचे आत्मचिंतन ताईसाहेब कधी करणार आहात ?

### प्रा. टीपी मुंडे, फुलचंद कराड, नितीन चंद्र कोटेचा,अमरसिंह पंडित, लक्ष्मण आण्णा पवार, रमेश आडसकर, प्रकाश दादा सोळंके, राजाभाऊ मुंडे, भीमराव धोंडे, बाळासाहेब आजबे, संगीता ठोंबरे, विद्यमान खासदार बजरंग सोनवणे यासह सोडून जाणाऱ्या मध्ये एक नव्हे किती नावे दिग्गजांची घ्यावी....?

ज्यांनी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचे नेतृत्व घडवण्यामध्ये आपले आयुष्य वेचले असे एक नव्हे हजारो कार्यकर्ते बीड जिल्ह्यामध्ये साहेबांच्या नंतर देखील जीवाला जीव देण्यासाठी सक्षमपणे ताईंच्या पाठीशी उभे राहिले होते. पण आज हे दिग्गज नेते कुठे आहेत. याची विचारणा तरी ताईसाहेब आपण कधी केली का..? यामध्ये प्रामुख्याने गेवराई मतदार संघावर वर्चस्व असलेले माजी आमदार अमरसिंह पंडित, भारतीय जनता पार्टीचे माजी आमदार निष्ठावंत लक्ष्मणांना पवार (यांनी आपल्या भूमिकेमुळे उघडपणे विरोध केला ते लक्ष्मणांना का दुखावले) माजलगाव मतदार संघातील तुल्यबळ नेतृत्व असलेले माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,विद्यमान राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश दादा सोळंके, यांच्यासह रमेश आडसकर,ज्यांनी आपलं दैवत मुंडे साहेबांना मानलं ते राजाभाऊ मुंडे,त्यांचे चिरंजीव बाबरी मुंडे,कधी काळी नाराज होऊन गेलेले सध्या स्वग्रही असलेले माजी आमदार केशवराव आंधळे, त्याच पद्धतीने कधीकाळी नाराज होऊन बाहेर गेलेले आणि आता स्वग्रही असलेले सोमनाथराव बडे (हे आज जरी पक्षात असले तरी मनाने आपल्या सोबत आहेत का ?) परळी मतदारसंघात ज्यांनी मुंडे साहेबांचे नेतृत्व खऱ्या अर्थाने फुलवले ते त्यांचे जिवलग मित्र प्रा. टी.पी. मुंडे मुंडे, साहेबांचे एकनिष्ठ असलेले फुलचंद कराड,केज विधानसभा मतदारसंघातील माजी आमदार संगीता ताई ठोंबरे, अल्पसंख्यांक समाजातील उभरते नेतृत्व हारुण इनामदार, चंद्रशेखर वडमारे, विधानसभा निवडणूक लढवलेले व्यंकटराव नेटके, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहिलेले देवेंद्र शेटे (आज जरी पक्षात असले तरी देखील आपल्यासाठी सक्रिय आहेत का ?) इतकेच नव्हे तर बीड जिल्ह्याचे विद्यमान राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनवणे हे आज भाजपा पक्षात का राहिले नाहीत ? तर भाजपा पक्षात असून ही सक्रिय नसलेले केज मधील मुंडे साहेबांचे एकनिष्ठ म्हणून ओळखले जाणारे माधवराव कुलकर्णी, हरिभाऊ गिरी, राजाभाऊ देशपांडे, अँड माणिकराव घुले, चंद्रकांत पाटील आज ही सगळे मंडळी भाजपापासून आणि ताई साहेबांपासून अलिप्त आहे हे का...? धारूर तालुक्यातील शेख गफार, बालाजी जाधव, अँड अर्जुन तिडके, महादेव तोंडे, सुदाम बडे, वडवणी तालुक्यातील अरुणराव गुरसाळी, विठ्ठलराव वरवडे, तसेच आष्टी मतदार संघातील दिग्गज माजी आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे साहेब, दशरथ दादा वनवे यासारखे कितीतरी दिग्गज नेत्यांची नावे सांगता येतील जे आज मुंडे साहेबांना आपले दैवत मानत असले तरी देखील आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी ताई साहेबांचे नेतृत्व सोडून इतर पक्षांमध्ये आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी धडपडत आहेत. ही शोकांतिका बीड जिल्ह्यातील भाजपाची म्हणावी, की ताईसाहेब आपली म्हणावी ? अशी वेळ निश्चितच आलेली आहे.




## बीड नगराध्यक्ष पदासाठी दिव्या महेश स्वामी यांचा पहिला उमेदवारी अर्ज दाखल

बीड /प्रतिनिधी

बीड नगराध्यक्ष पद अनुसूचित जाती महिलांसाठी राखीव झाले आहे. या पदासाठी उच्चशिक्षित एमएससी ॲग्री झालेल्या आणि सध्या स्पर्धा परीक्षेची तयारी करत असलेल्या तरुण अविवाहित दिव्या महेश स्वामी यांनी नगराध्यक्ष पदासाठी पहिला अर्ज दाखल केला आहे.

बीड नगरपालिकेच्या निवडणूक कक्षामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी कविता जाधव यांच्याकडे बीड नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र अनुक्रमांक १ नुसार १३ नोव्हेंबर रोजी दाखल केले आहे. यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश

(उर्वरीत पान २ वर)

# तिकिटाच्या पैशावरून प्रवासी पागलने वाहक प्रभुला झोडपले !

## वाहक प्रभू गीतेंच्या तक्रारीवरून प्रवासी सातलिंग बागल विरुद्ध गुन्हा दाखल

### आगार प्रमुख अमर राऊत म्हणजे असून अडचण नसून खोळंबा, विभाग नियंत्रक बीड तरी लक्ष घालणार काय..?

कर्मचारी संघटनांनी आपेगाव मार्गावर रस्ता पूर्ण खराब आसल्याने सदर मार्गावरील प्रवासी वाहतूक बंद करण्याची वारंवार मागणी केलेली आहे. परंतु आगार प्रमुख हे त्यांच्या तक्रारीकडे साफ दुर्लक्ष करत आसल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी आहे. सदर मार्गावर खराब रस्ता आसताना ही क्षमतेपेक्षा जास्तीची प्रवासी वाहतूक चालक–वाहकांना करावी लागत आहे. त्यामुळे सदर मार्गावर वारंवार प्रवासी आणि चालक–वाहकांच्या तक्रारी वाढत आहेत. या गंभीर बाबीकडे विभाग नियंत्रक बीड यांनी तरी लक्ष घालून कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता सदर रस्ता दुरूस्त होईपर्यंत प्रवासी वाहतूक बंद करण्याची मागणी कर्मचारी संघटना प्रतीनीधी करणार आसल्याचे समजले. शिवाय प्रत्येक वेळी या ना त्याकारणाने गुणवत्तेत असलेला आंब्याच्या आगार आगार प्रमुख पदी अमर राऊत आल्यापासून मात्र गुणांकन चांगले ढासळले असल्याने आगारप्रमुख राऊतांची बदली होणे नितांत गरजेची आहे. नाहीतर दिवसेंदिवस अंबेजोगाई आगाराचा कारभार आहे त्यापेक्षा ढासळून उत्पन्नातही मोठ्या प्रमाणात घट होणार असल्याचे अनेक कर्मचाऱ्यांनी बोलून दाखवले. तेव्हा आता विभागीय नियंत्रण व मराठवाडा विभाग प्रमुख नेमके काय करणार याकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागून आहे.

### आपेगाव मार्गावर एसटीच्या चालक वाहकांना नेहमीचाच त्रास

अबांजोगाई आपेगाव मार्गावरील प्रवांशाकडून नियमितपणे चालक–वाहकांना मारहाण होण्याच्या घटना घडत आहेत.याकडे आगार प्रशासनाचे दुर्लक्ष आसल्याची माहिती खुद्द कर्मचाऱ्यांनकडून सांगण्यात आली.

अंबाजोगाई /प्रतिनिधी

अंबाजोगाई आगारातील एसटीचे वाहक प्रभू रावण गीत्ते वय ४१ वर्ष व्यवसाय एस. टी. वाहक क्र ३४३४ रा नंदागौळ ता परळी यांना बसमधील प्रवासी सातलिंग बागल यांनी तिकिटाच्या पैशावरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी वाहकाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेचे प्राप्त माहिती अशी की, एसटीचे वाहक प्रभू गीते यांनी पोलीस स्टेशनला येवुन तोंडी सांगून फिर्याद दिली कि, मी वरील ठिकाणी माझ्या कूटूंबासोबत राहत असून मागील १२ वर्षापासुन अंबाजोगाई येथील बस

(उर्वरीत पान २ वर)

# बीड नगरपरिषद निवडणूक स्व:बळावर लढविण्याचा निर्णय – जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर

बीड /प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख मा.उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना नेते श्री.अंबादास दानवे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली, बीड नगरपरिषद निवडणूक शक्तीनिशी लढवून जिंकण्यासाठी आज शिवसेना जिल्हाप्रमुख श्री.गणेशभाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख उल्हासभैय्या गिराम, तालुकाप्रमुख श्री.गोरख अण्णा सिंघन, जिल्हासंघटक नितिनभैय्या धांडे यांनी शहरातील विविध हिंदू आणि मुस्लिम प्रभागांमध्ये जाऊन कॉर्नर सभा घेऊन मतदारांशी संवाद साधला.

या संवादादरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवारांना आपला आशीर्वाद द्यावा, अशी विनंती पदाधिकाऱ्यांनी मतदारांना केली.यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की, उद्धवसाहेबांच्या आदेशानुसार सर्व प्रभागांत उमेदवारी अर्ज दाखल करावेत आणि स्वबळावर लढण्याची पूर्ण तयारी ठेवावी. बीड नगरपरिषद क्षेत्रातील सर्व २६ प्रभागांमध्ये शिवसेना उमेदवार देणार असून, ही निवडणूक आम्ही ताकदीने लढवून विजयी करणार आहोत.

सभा दरम्यान सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून आले. लोकांनी भरभरून प्रतिसाद देत शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचे ठिकठिकाणी स्वागत सत्कार केले आहेत. तसेच मतदारांनी,

(उर्वरीत पान २ वर)





## पाली जिल्हा परिषदच्या अनुषंगाने बप्पासाहेब घुगे यांची बोरफडी येथे बैठक संपन्न

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पाली जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत बोरफडी येथे ग्रामस्थांच्या उपस्थितीत भव्य बैठक संपन्न झाली. या बैठकीत बप्पासाहेब घुगे यांचा गेल्या निवडणुकीत थोड्या मताने पराभव झाला असला तरी या होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी करण्याचा ठाम निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.

बैठकी दरम्यान गावातील ज्येष्ठ

(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

### हार–जीत कोणाची ?

बिहार विधानसभा निवडणुकीचे दुस–या आणि अंतिम टप्प्याचे मतदान मंगळवारी शांततेत पार पडले. अंतिम टप्प्यात २० जिल्ह्यांमधील १२२ जागांसाठी मतदारांनी आपला कौल नोंदवला. या टप्प्यात आजपर्यंतचे सर्वाधिक म्हणजे ६८.६५ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात ६४.६६ टक्के मतदान झाले होते. दुस–या टप्प्यात मुस्लिमबहुल किशनगंजमध्ये सर्वाधिक ७७.७५ टक्के मतदान झाले. त्यापाठोपाठ कटिहार (७५.२३ टक्के), पूर्णिया (७३.७९ टक्के), सुपौल (७०.६९ टक्के) आणि अररियात ६७.७९ टक्के मतदान झाले. हे सर्व जिल्हे नेपाळलगतच्या सीमेजवळ आहेत. दक्षिण बिहारमध्ये सुद्धा मतदानाचा टक्का अधिक राहिला. दुस–या टप्प्यात मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या मंत्रिमंडळातील ८ मंत्र्यांसह एकूण १३०२ उमेदवारांच्या भविष्याचा फैसला ईव्हीएममध्ये बंदिस्त झाला. दुस–या टप्प्यातील मतदानासाठी अनेक केंद्रांवर लांबच लांब रांगा लागल्याचे दिसून आले. बिहारमध्ये यंदा बंपर मतदान झाल्याने आता सा–यांच्या नजरा १४ नोव्हेंबरकडे लागल्या आहेत. २४३ सदस्यांच्या विधानसभेत बहुमतासाठी १२२ जागा लागतील.

बिहारमध्ये दुस–या आणि अंतिम टप्प्याचे मतदान पार पडल्यानंतर प्रमुख ९ सर्वेक्षण संस्थांनी केलेल्या मतदानोत्तर चाचण्यांनुसार राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (रालोआ) १३३ ते १६७ जागा मिळण्याची शक्यता आहे. अर्थात मतदानोत्तर चाचण्या चुकीच्याही ठरू शकतात.

# कवडगावातून अशोक निपटे यांना मिळु शकते उमेदवारी !



वडवणी /प्रतिनिधी

सर्वसाधारणसाठी सुटलेल्या कवडगाव पंचायत समिती गणातून लोकप्रिय नेते आमदार प्रकाश दादा सोळंके हे पिंपरखेडचे माजी सरपंच तथा विद्यमान उपसरपंच आणि ख्यातनाम पत्रकार अशोक निपटे यांनाच निवडणूक लढण्याची संधी देतील अशी चर्चा या भागातील नागरिकांमध्ये होत आहे. गेल्या निवडणुकीत अशोक निपटे यांना ऐनवेळी माघार घ्यावी लागली होती. त्यामुळे यावेळेस त्यांना संधी दिली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

वडवणी तालुक्यातील कवडगाव पंचायत समिती गण सर्वसाधारणसाठी आहे. या ठिकाणी सन २०१२ साली पिंपरखेडचे रहिवासी असलेले प्रख्यात पत्रकार अशोक निपटे यांनी उमेदवारी मागितली होती. त्यावेळी या भागातील सर्वसामान्य लोकांकडून त्यांच्या उमेदवारीची मोठ्या प्रमाणात मागणी झाली होती. एवढेच नाही तर वडवणी तालुक्यातील सर्व पत्रकारांनी देखील आमदार प्रकाश दादा यांची भेट घेऊन उमेदवारी देण्यासाठी विनंती केली होती. जनरेटा लक्षात घेऊन त्यावेळी त्यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात होती. मात्र ऐनवेळी त्यांची उमेदवारी डावलून निवडणूक प्रक्रियेतील उमेदवारी वाटप करणारे व्यक्तीच उभे राहिले होते. त्याचा फटका ही पक्षाला बसला होता. त्यानंतर अशोक निपटे यांनी गावचे सरपंच पद भूषवून आमदार सोळंके यांच्या नेतृत्वाखाली गावचा कायापालट करण्यासाठी पुढाकार घेतला होता. सध्याही अशोक निपटे पिंपरखेड गावचे उपसरपंच आहेत आमदार प्रकाश दादा सोळंके, धैर्यशील काका सोळंके तसेच युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांच्या नेतृत्वाखाली अशोक निपटे यांनी पिंपरखेड गावांमधील सर्वसामान्य शेतकरी सामान्य माणसाचे प्रश्न सोडविण्याची कामगिरी केलेली आहे. कवडगाव पंचायत समिती गणातील कवडगाव मोरेवाडी देवडी खळवट लिमगाव काडीवडगाव चिंचवडगाव खापरवाडी पिंपरखेड या गावातील सर्वसामान्य शेतकरी, शेतमजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतलेला आहे. एक पत्रकार असल्यामुळे प्रशासनामध्ये त्यांची चांगली वचक आहे. मागील पंचवीस वर्षापासून सतत समाजसेवेसाठी धडपड करणारे अशोक निपटे यांचा फायदा वेळोवेळी आमदार सोळंके यांच्या गटाला झाला आहे. गेल्या वेळेसची संधी हुकल्यामुळे या निवडणुकीत तरी अशोक निपटे यांना उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी या भागातील शेतकऱ्यांमधून होत आहे. या मागणीचा विचार करून आमदार प्रकाश दादा सोळंके अशोक निपटे यांनाच पंचायत समितीची उमेदवारी देऊन संधी देतील

### दादांनी आणि भैय्यांनी संधी दिली तर लढणार

याबाबत अशोक निपटे यांना विचारले असता प्रकाशदादा सोळंके यांचे नेतृत्व आमच्यासाठी मोठे आहे दादा आणि जयसिंग भैया जो निर्णय घेतील तो आमच्यासाठी महत्त्वाचा आहे उमेदवारी दिली तर निश्चितच १००% निवडून येऊ आणि दादांच्या आणि भैया जनतृत्वाखाली या भागाचा कायापालट करण्यासाठी प्रयत्न करु अशी ग्वाही अशोक निपटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली.

---

**तहसील कार्यालय, कळंब**

**जा.क्र. २०२५ / मह/दंडणीय/कावी–दिनांक २४/०९/२०२५**

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, या कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांचेमार्फत श्री मुमताज मन्सुर दखनी रा. शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांनी त्यांची मुलगी बेनजीर मुमताज देखणी यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे..

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शिराढोण ता कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. ०५/०२/२००६ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. ३१/०७/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

**तहसील कार्यालय, कळंब**

**जा.क्र. २०२५ / मह/दंडणीय/कावी–दिनांक २०/०९/२०२५**

**जाहिर प्रगटन**

समस्त गावकरी शिराढोण ता कळंब जि. धाराशिव यांना कळविण्यात येते की, पा कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांचेमार्फत श्री साजीद जमील अहेमद फारोकी रा. शिराढोण ता कळंब जि, धाराशिव यांनी त्यांची मुलगी अलिशा साजीद फारोकी यांचे जन्म प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रमाणपत्र धारकाचे गाव मौ शिराढोण ता. कळंब हे असून सदर व्यक्तीचा मौजे शिराढोण ता कळंब जि. धाराशिव या ठिकाणी दि. २५/०१/२०११ रोजी जन्म झाला असून जन्म प्रमाणपत्र मिळणेसंबंधी सदरील कार्यालयात ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिराढोण यांनी दि. ३१/०७/२०२५ रोजी आपल्या अभिप्रायासह व आवश्यक कागदपत्रांसह अहवाल सादर केला आहे. वरील जन्म बाबत कोणाचा आक्षेप असल्यास हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत आपला लेखी आक्षेप या कार्यालयास सादर करावा, आक्षेप मुदतीनंतरच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**कार्यकारी दंडाधिकारी,**
**कळंब**

---

# अवधूत पाटील यांची युवासेना जिल्हा संघटक पदी नियुक्ती

कळंब /प्रतिनिधी

तालुक्यातील शिराढोण येथील युवा नेते अवधूत विलासराव पाटील यांची युवासेना जिल्हा संघटक पदी नियुक्ती निवड करण्यात आली आहे. वंदनीय शिवसेनाप्रमुख श्रीमान बाळासाहेब ठाकरे यांच्या ज्वलंत भगव्या विचाराने प्रेरित होऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब यांच्या आदेशानुसार युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याचे खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर आमदार कैलास पाटील शिवसेना सहस प्रमुख मरकंद राजे निंबाळकर शिवसेना जिल्हाप्रमुख रंजीत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेना जिल्हा संघटक पदी नियुक्ती झाली आहे.त्यांना



नियुक्तीचे पत्र मनोहर मुरलीधर धोंगडे जिल्हा युवा अधिकारी धाराशिव यांनी कळब शिवसेना संपर्क कार्यालयांमध्ये त्यांचा सत्कार करून देण्यात आले आहे. यावेळी शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९१७/२०२५**
अर्जुन वामनराव धुरंधरे वि.निरंक
**(मार्फत–ॲड.बांगर ए.बी.)**

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मीबाई अर्जुनराव धुरंधरे दि.०९.०९.२०२४ रोजी मौज साई बाबा हॉस्पिटल, शिर्डी** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. अर्जुन वामणराव धुरंधरे, वय–६८ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड, २. रमेश अर्जुन धुरंधरे, वय–४४ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड, ३.भाऊसाहेब अर्जुरन धुरंधरे, वय–४२ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही गेवराई जि.बीड ४.छाया पावलस सकट, वय–४७ वर्षे, धंदा–शेती, रा.बदनापुर ता.बदनापूर जि.जालना, ५. अंजना व्हिक्टर आव्हाड, वय–३४ वर्षे, धंदा–घरकाम, रा.छत्रपती संभाजीनगर ता.जि.छत्रपती संभाजीनगर**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **लक्ष्मीबाई अर्जुनराव धुरंधुरे, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१५/१२/२०२५**

**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती एस.एच.पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२०/२०२५**
अर्जुन वामनराव धुरंधरे वि.निरंक
**(मार्फत–ॲड.बांगर ए.बी.)**

ज्याअर्थी मयत नामे **जिजाबाई वामनराव धुरंधरे हे दि.२७.०८.२०२४ रोजी मौजे मादळमोही ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. अर्जुन वामणराव धुरंधरे, वय–६८ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही वामनराव धुरंधरे वय–५९ वर्षे, धंदा–शेती, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड, ३.आसराबाई रामभाऊ सकट वय–७९ वर्षे, धंदा–घरकाम, रा.मादळमोही गेवराई जि.बीड**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **जिजाबाई वामनराव धुरंधरे, रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१५/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८९४/२०२५**
संगीता बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख वि.भागवत बंडू उर्फ प्रल्हाद देशमुख
**(मार्फत–ॲड.वावरे ए.के.गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे **बंडू पि.विठ्ठलराव देशमुख, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड हे दि.०५.११.२०२३ रोजी रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१. संगीता भ्र.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख,वय–४२ वर्षे, धंदा–घरकाम व शेती, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड, ह.मु.प्लॉट नं.३० हिंगणा रोड, राजगृह नगर, नागपुर सिटी इंदल अरे नागपुर, ता.जि.नागपुर, २. संग्राम पि.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख, वय–२२ वर्षे, धंदा–शिक्षण, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड, गैरअर्जदार–१.भागवत पि.बंडु उर्फ प्रल्हाद देशमुख वय–२४ वर्षे, धंदा–शेती, रा.रामपुरी ता.गेवराई जि.बीड**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बंडु पि.विठ्ठलराव देशमुख** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.०६/११/२०२५** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१२/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९२६/२०२५**
तुकाराम बाजीराव गव्हाणे वि.निरंक
**(मार्फत–ॲड.पिसाळ के.एल.)**

ज्याअर्थी मयत नामे **बाजीराव सर्जेराव गव्हाणे हे दि.१२.०२.२०२० रोजी मौजे सावरगांव ता.गेवराई जि.बीड** येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार **१.तुकाराम पि.बाजीराव गव्हाणे, वय–६५ वर्षे, धंदा–मजुरी, रा.सावरगांव ता.गेवराई जि.बीड, २.आशाबाई पि.बाजीराव गव्हाणे, वय–६२ वर्षे, धंदा–मजुरी, रा.सावरगांव ता.गेवराई जि.बीड, ३. रूक्मीण पि.बाजीराव गव्हाणे, वय–५८ वर्षे, धंदा–मजुरी रा.सदर**

यांना शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर **बाजीराव सर्जेराव गव्हाणे** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दि.–/–/–** रोजी माझ्या स्वाक्षरिनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**पुढील तारिख –१८/१२/२०२५**

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

पान १ वरून...

**देशात हुकमी एक्का..**

नेतृत्वांच्या आणि जनतेच्या मनात स्वाभिमान निर्माण करत गोपीनाथ मुंडे या तरुण नेतृत्वाने एक एक कार्यकर्ता जोडत पवारांच्या जबड्यातून हा जिल्हा अलगद बाहेर काढत भाजपाचा बालेकिल्ला केला. यासाठी त्यांनी पवारांचे बीड जिल्ह्यातील सर्व रथी महारथी यांना त्यांच्या पक्षातून फोडून भाजपा पक्षात प्रवेश देत त्यांच्या कपाळाला गुलाल लावण्याचे धाडस उभे केले. बीड जिल्ह्यातील अनेक विरोधी पक्षातील नेत्यांना मुंडे साहेबांनी आपले खास निष्ठावंत म्हणून त्यांनी कार्यरत ठेवलेले होते. त्यामुळे विरोधी पक्षात काय चालले आहे हे सुद्धा मुंडे साहेबांना कळत होते आणि पक्षांतर्गत काय परिस्थिती आहे यावरही त्यांचा थेट वाच होता. त्यामुळे मुंडे साहेब यांनी बीड जिल्ह्यात आपले वर्चस्व निर्माण केल्यानंतर त्यांच्या आशीर्वादा शिवाय आमदार,खासदार च नव्हे तर जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद अध्यक्ष, सभापती,पंचायत समितीचे सदस्य, सभापती, नगरपालिकेचे नगरसेवक, नगराध्यक्ष तसेच विविध स्थानिक स्वराज्य संस्था, ग्रामपंचायती यावर सुद्धा मुंडे साहेबांचे बारकाईने लक्ष असायचे. प्रत्येकाच्या सुखदुःखात ते स्वतः सहभागी व्हायचे. मुंबईत असो की दिल्लीत असो त्यांचे कायम बीड जिल्ह्याकडे लक्ष असायचे आणि ते कायम म्हणायचे गरुडाने कितीही गगन भरारी घेतली तरीही त्याचे चित्त मात्र आपल्या पिल्लांपाशीच असते अगदी त्याप्रमाणेच मी कुठेही असलो तरी माझे सर्व लक्ष माझ्या बीड जिल्ह्यावरच असते. मात्र दुर्दैवाने त्यांच्या पश्चात मागील अकरा वर्षांमध्ये हळूहळू बीड जिल्ह्यावरील भाजपाची पकड मुंडे साहेबांच्या राजकीय वारस म्हणून ज्यांना बीडच्या जनतेने डोक्यावर घेतले तर हातावरील फोडाप्रमाणे या नेतृत्वाला जपले त्याच नेतृत्वाला या बीड जिल्ह्याला भाजपाचा बालेकिल्ला म्हणून, मुंडेंचा बालेकिल्ला म्हणून कायम ठेवता आले नाही. हे अपयश नेतृत्व विचलित असल्यामुळे आले आहे का ? असे म्हणण्याची वेळ आली आहे.एकापाठोपाठ एक मुंडे साहेबांचे एकनिष्ठ भाजपा सोडून इतर पक्षात जात आहेत.मात्र याचे थोडेही शल्य मुंडे साहेबांच्या राजकीय वारसदार म्हणून पुढे आलेल्या ज्यांना बीड जिल्ह्यातील जनतेने मुंडे साहेब त्यांच्यात पाहून नेतृत्व स्वीकारले त्या पंकजाताई मुंडेंना नसावं यापेक्षा दुसरं दुर्दैव काय म्हणावं.

**तिकिटाच्या पैशावरून...**

आगार येथे वाहक म्हणुन नोकरीस आहे. दि १३/११/२०२५ रोजी मला अंबाजोगाई ते आप्पेगाव या मार्गावर बस मध्ये वाहक म्हणुन कर्तव्यावर नेमले होते. आज दि.१३/११/२०२५ रोजी माझी अंबाजोगाई ते आप्पेगाव या मार्गावर बस क्र चक२०इङ२८१९ या बसवर मी वाहक म्हणून व सोबत चालक गणपती वसंतराव लव्हारे रा. पट्टीवडगाव ता. अंबाजोगाई यांच्यासह ड्यूटी असल्यामूळे आम्ही सकाळी ०६:३० वाजता अंबाजोगाई बसस्थानका कडुन आप्पेगावकडे प्रवाश्यासह निघालो होतो बस मधील एका प्रवाश्याने मला अंबाजोगाई ते कोळकानडी ईथ पर्यत तिकीट काढण्यासाठी ५०० रु दिले असता माझ्याकडे सुट्टे पैसे नसल्यामुळे मी त्यांना सुट्टे पैसे द्या नाही तर गाडी परत येताना तिकिटाचे पैसे द्या असे सांगितले. त्यांना मी त्यांचे ९ रूपयाचे तिकीट पैसे न घेता दिले व त्याचे ५०० रु त्यांना परत दिले. परत येताना आम्हाला तिकीटाचे पैसे द्या असे सांगीतले. त्यानंतर तो प्रवाशी ईसम पैसे न देता कोळकानडी येथे उत्तरला त्यानंतर आमची बस आप्पेगाव येथे जावुन परत कोळकानडी येथे ८:३० वाजता आली असता प्रवासी उतारण्यासाठी व चढण्यासाठी गाडी थांबली होती तेव्हा आपेगाव येथे जाताना ज्या प्रवाश्याने बस मध्ये बस तिकिटाचे पैसे दिले नव्हते तो प्रवाशी आमच्या बसजवळ आला असता मी त्यांना

पान १ वरून...

तिकीटाचे सुट्टे पैसे ९ रू राहिलेले द्या असे म्हणालो असता त्याने मला मायघालीच्या तूझे पैसे घे म्हणून शिवी देवून तिकीटाचे पैसे १० रू दिले. त्यानंतर त्याला ०१ रूपया परत दिला तेव्हा तुम्ही मला शिवी का देत आहेत असे विचारले असता त्याने मला गाडीचे खाली ओढुन गच्चुरीला धरुन चापटाबुक्यांनी व बुटानी मारहाण करुन शिवीगाळ केली. आमच्या भांडणाची सोडवासोडय गाडीचे चालक गणपती वसंतराव लव्हारे रा. पट्टीवडगाव ता. अंबाजोगाई यांनी व ईतर तेथील काही लोकांनी सोडवासोडव केली मारहाण केलेल्या व्यक्तीचे नाव गावातील लोकांना विचारले असता त्याचे नाव सातलिंग गंगाधर बागल रा. कोळकानडी असे असलेचे समजले. तरी दि.१३/११/२०२५ रोजी मी अंबाजोगाई ते आप्पेगाव या मार्गावर बस मध्ये वाहक म्हणुन कर्तव्य करीत असताना इसम नामे सातलिंग गंगाधर बागल रा. कोळकानडी याने तिकिटाचे सुट्टे पैसे देण्याच्या कारणावरुन मला शिवीगाळ करुन चापटाबुक्यानी व बूटाने मारहाण करुन मी बजावत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला म्हणून माझी त्यांच्याविरुद्ध कायदेशीर तक्रार आहे. यावरून अंबाजोगाई ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल झाला आहे.

**पाली जिल्हा परिषदच्या....**

नागरिक, युवक वर्ग, तसेच महिलांनी ही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. बप्पासाहेब घुगे हे सर्वसामान्यांच्या सुखदुःखात कायम सहभागी राहणारे नेते असल्याने त्यांच्याविषयी जनतेत विशेष आत्मीयता आहे, असेही मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. ग्रामविकासाच्या दिशेने घुगे यांचे नेतृत्व सक्षम असून, ते जनतेच्या मनात घर करून आहेत, असे मत या बैठकीत मांडण्यात आले. शेवटी सर्व उपस्थित ग्रामस्थांनी बप्पासाहेब घुगे यांना निवडून देऊ, विकासाचा संकल्प पूर्ण करू असा नारा देत निवडणूक लढाईसाठी एकजूट दाखवली.

**बीड नगरपरिषद....**

आम्ही शिवसेनेच्या पाठीशी भक्कमपणे उभे आहोत असा विश्वासही व्यक्त केला.यावेळी प्रत्येक प्रभागातील बैठकींमध्ये उपस्थित असलेले उपजिल्हाप्रमुख राजुभाऊ महुवाले, जिल्हासंघटक रतन तात्या गुजर, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, युवा सेना बीड तालुका युवा अधिकारी बारिकराव येवले, युवा सेना उपजिल्हा अधिकारी अशपाकभाई शेख, युवा नेते बिलालभाई शेख, डॉ.आशिफभाई, आकाश घोरपडे, यास्मिन शेख, नुजत बाजी, तालुका सहसचिव संदीप भानप, तसेच शिवसेनेचे अन्य पदाधिकारी, शिवसैनिक आणि मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**बीड नगराध्यक्ष पदासाठी...**

फडसे यांची उपस्थिती होती. उमेदवारांच्या अर्जाची छाननी १८ नोव्हेंबर रोजी होणार आहे.बीड नगराध्यक्ष पदासाठी अतिशय सामान्य कुटुंबातील उच्च शिक्षित तरुण असलेल्या दिव्या महेश स्वामी यांनी समाजाच्या आग्रहास्तव उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विविध राजकीय पक्षांनी उमेदवारीसाठी विचारणा केली. मात्र अपक्ष म्हणून निवडणूक लढवण्याचा निर्धार सद्यस्थितीत तरी केला असल्याचे अपक्ष उमेदवार दिव्या स्वामी यांनी स्पष्ट केले आहे. तिच्या उमेदवारीमुळे वीरशैव लिंगायत समाजासह सर्वसामान्य मतदारांमधून उस्फूर्तपणे स्वागत होत आहे. उमेदवार दिव्याचे आजोबा ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक केज मतदार संघाचे पहिले आमदार कै. रामलिंग स्वामी हे होते.तर मोठे बंधू वैभव स्वामी हे पत्रकार असून त्यांनी देखील केज विधानसभा राखीव मतदार संघातून दोन वेळा निवडणूक लढवलेली आहे. त्यांचा आदर्श समोर ठेवूनच मी नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवणार असल्याचे दिव्या स्वामी यांनी सांगितले आहे.

---



# रांजणीच्या साई कॉलेजचे विद्यार्थ्यांची फ्रान्स, सौदी अरेबिया व दुबई या परदेश वारीसाठी निवड

धीरज शिंदे, चैतन्य सुरवसे, साकिब तांबोळी यांनी रोवला साई कॉलेजच्या शिरपेचात तुरा

रांजणी /प्रतिनिधी

रांजणी येथील साई कॉलेज ऑफ कॉम्प्युटर एज्युकेशनचा विद्यार्थी धीरज शिंदे याची फ्रान्स येथे वर्ल्ड लाईन ग्लोबल सर्व्हिसेस या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये पाच वर्षांसाठी सीनियर असोसिएट कन्सल्टंट या पदावर निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचा नॅचरल उद्योग समूहाचे संस्थापक कृषीरत्न बी. बी. ठोंबरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

धीरज शिंदे यांना १८ लाखांचे वार्षिक पॅकेज तसेच किमान पाच लाख रुपयांपर्यंतचा अतिरिक्त भत्ता मिळणार असून, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेऊन त्यांनी हे यश संपादन केले आहे. शेतकरी कुटुंबातील ग्रामीण भागातून जागतिक स्तरावर पोहोचलेल्या या विद्यार्थ्याच्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या प्रसंगी श्री साई सर्वांगीण विकास प्रतिष्ठानचे सचिव ए. बी. ठोंबरे,नॅचरल दुग्ध प्रकल्प समन्वयक श्रीपाद ठोंबरे, महाविद्यालयाचे प्राचार्य जे. सी. गवळी, एच आर . समीर सय्यद , कामगार कल्याण अधिकारी एम. बी. नाईक नवरे आदी मान्यवर उपस्थित होते.याच वेळी साई कॉलेजचे विद्यार्थी चैतन्य सुरवसे याची सौदी अरेबिया येथे सीनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून तर साकेब तांबोळी याची दुबई येथे व्यवस्थापन क्षेत्रात निवड झाली आहे.

# शेतीतून पर्यटनाची वाट, मातोश्री पर्यटन केंद्राची हरित प्रेरणागाथा

## इवलेसे रोप लावीयले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी
## आज मातोश्री पर्यटन केंद्र १४ नोव्हेंबर २०२५ वर्धापनदिन

अंबड प्रतिनिधी

इवलेसे रोप लावीयले द्वारी त्याचा वेलू गेला गगनावरी...या ओळीप्रमाणेच एका छोटच्याशा विचाराच्या रोपट्याने आज गगनाला भिडलेली प्रेरणादायी कहाणी म्हणजे मातोश्री पर्यटन केंद्र,लालवाडी ता.अंबड जि.जालना

जालना-अंबड महामार्गालगत असलेल्या या हिरव्या परसात आज पहिल्या वर्धापनदिनाचा उत्साह उसळला आहे.केवळ एका वर्षातच हे केंद्र ग्रामीण पर्यटनाचं आदर्श उदाहरण ठरलं आहे आणि या यशामागे आहेत शेतकरी उद्योजक गोवर्धन पाटील उगले ज्यांनी शेती सोडायची नाही पण शेतीतच काहीतरी वेगळं करायचं हा निर्धार केला आणि तो कृतीत उतरवला.शेतीतून पर्यटनाकडे नवविचारांची वाटचाल शेती म्हणजे कष्ट पण त्यातून समाधान नाही...असं गोवर्धन पाटील उगले सांगतात.बदलत्या हवामानाने,घटत्या पावसाने आणि उत्पादनाला न मिळणाऱ्या दराने त्रस्त होत त्यांनी शेती सोडण्याचा विचार केला पण मनातील शेतकरी हरला नाही. त्या विचारातून जन्म झाला मातोश्री पर्यटन केंद्रा'चा

त्यांनी ठरवलं शेतीला शिक्षण संस्कृती आणि आनंदाशी





### गोवर्धन पाटील उगले यांनी दाखवून दिला ग्रामीण पर्यटनातून गावाचा विकास आणि रोजगाराची नवी दिशा

जोडायचं.पर्यटकांना शेतीचा प्रत्यक्ष अनुभव द्यायचा आणि गावकऱ्यांना रोजगार मिळवून द्यायचा. आज हा विचार वास्तवात उतरला आहे.

गोवर्धन उगले यांनी या केंद्राला फक्त पर्यटनस्थळ न बनवता जीवनशाळा बनवलं आहे.ऋी ीं झश्रीश या संकल्पनेवर आधारित शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांसाठी आयोजित केल्या जातात.येथील प्रत्येक फेरी म्हणजे पर्यावरण,शेती आणि संस्कृतीचा थेट अनुभव.

स्थानिक रोजगार, महिलांचा आत्मविश्वास आणि गावाचा विकास या केंद्रामुळे परिसरातील युवक-युवतींना रोजगाराची नवी संधी मिळाली आहे.गावातील महिलांनी स्वयंपाक, हस्तकला आणि कृषीउत्पादन विक्रीतून स्वतःचा लघुउद्योग सुरू केला आहे. गावातील प्रत्येक हाताला काम आणि प्रत्येक चेहऱ्यावर समाधानाचे हास्य दिसते.आमचं गाव आता पर्यटकांचं आवडतं ठिकाण झालंय ग्रामस्थ अभिमानाने सांगतात.तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त एक पर्यटक एक झाड १४ नोव्हेंबर २०२५ रोजी वर्धापनदिनाच्या निमित्ताने एक आगळी वेगळी हरित मोहिम सुरू होत आहे एक पर्यटक एक झाडप्रत्येक पाहुण्याने एक रोप लावायचं आणि त्या झाडाशी आपली नाळ जोडायची. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा आणि हरित क्रांतीचा संदेश दिला जाणार आहे. शेवटचा मणी विचार नापीक नसतो गोवर्धन पाटील उगले यांनी दाखवून दिलं की शेती नापीक नसते, नापीक असतात विचार संकटात संधी ओळखून नव्या वाटा शोधणारे उगले हे आज नव्या पिढीचे आदर्श ठरले आहेत.मातोश्री पर्यटन केंद्र हे फक्त एक पर्यटनस्थळ नाही तर निसर्गाशी, संस्कृतीशी आणि आत्म्याशी नाळ जोडणारी एक जीवनशाळा आहे.

### बारा एकरांवरील हरित स्वप्न

१२ एकरांवर पसरलेलं मातोश्री पर्यटन केंद्र म्हणजे ग्रामीण जीवनाचं जिवंत चित्र.गाई, शेळ्या, कुक्कुटपालन, धान्य आणि फळबागांची शिवार फेरी पर्यटकांना गावाची अस्सल ओळख देते. मुलांसाठी झोके, छोटा ट्रेन ट्रॅक, सायकलिंग झोन यामुळे शहरातील मुलांनाही खेडं म्हणजे काय याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.पारंपरिक झोपड्या,मातीचा सुगंध, लोकसंगीत आणि जिव्हाळ्याचं ग्रामीण जेवण हे सगळं मिळून निसर्गाच्या कुशीत एक नवा श्वास देतं.निसर्ग,परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम

लेखक :- फारुक शेख,अंबड
९१६८५१९१५९

# पान टपरी चालकाची मुलगी सभा शेख झाली सनदी लेखापाल

धाराशिव /प्रतिनिधी

शहरातील समता नगर येथील सबा शेख हिने सनदी लेखापाल परीक्षेत यश मिळविल्याबद्दल तिचे आमदार कैलास घाडगे पाटील यांनी सत्कार करुन अभिनंदन केले.अत्यंत हालाखीच्या आणि कठीण परिस्थितीत वाढलेल्या सबा यांच्या वडिलांनी पान टपरी चालवून आपल्या मुलीचं शिक्षण पूर्ण केले आहे. वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून सबा हिने ही शहरातीलच दीपक भातभागे यांच्या कार्यालयात शिक्षणासोबत काम करत जिद्दी व अथक परिश्रमाने हे यश संपादन केले असुन ती इतरांसाठी आदर्श बनली



आहे.याबद्दल सबाचे अभिनंदन व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत डॉ ढोबळे ज्ञ. एडुकेशन र्लीर्पीीश्रींरपलू. मुरूम. लातूर पुणे. बेळगाव. बेंगलोर. गुलबर्गा यांनी.

# पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण कार्यालयावर आदिवासी कोळी जमातींचा महामोर्चा धडकला

नांदेड /प्रतिनिधी

आद्य क्रांतीकारक राघोजी भांगरे प्रणित आदिवासी कोळी महादेव, डोंगर कोळी, मल्हार कोळी, टोकरे कोळी, कोळी ढोर या आदिवासी जमाती संघर्ष समितीच्यावतीने विविध मागण्या घेवून या संघर्ष समितीचे अध्यक्ष तथा समाज नेते दत्ताभाऊ सुरवसे यांच्या नेतृत्वाखाली व माजी मंत्री दशरथ भांडे, डी.एम.कोळी, प्रा.बाळासाहेब बळवंतकर, सौ.गितांजलीताई कोळी, महादेव व्हंकळी, रमेश पिट्टलवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत दि.११ सप्टेंबर २०२५ रोजी पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (टीआरटीआय) या कार्यालयावर हजारोंच्या संख्येने आदिवासी कोळी जमात बांधवांचा महामोर्चा धडकला.

आदिवासी कोळी जमातींची मुख्य मागणी म्हणजे जातीचे प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी सुलभरित्या मिळाले पाहिजे यासह इतर मागण्याच्या संदर्भाने संपूर्ण राज्यभरातून आदिवासी कोळी जमात बांधवांनी हजारोंच्या संख्येने या महामोर्चात सामील होवून टिआरटीआय पुणे या कार्यालयावर मोर्चा काढून धरणे आंदोलन केले. यावेळी संघर्ष समितीचे अध्यक्ष दत्ताभाऊ सुरवसे यांनी मोर्चाला संबोधीत केले.यावेळी सर्व कोळी उपजमातींमध्ये भेदभाव न करता सर्वांना समान न्याय व सवलती द्याव्यात, अशी मागणी या मोर्चाच्या वेळी करून समाजाच्या शिष्टमंडळाने आदिवासी संशोधन व



प्रशिक्षण (टीआरटीआय) कार्यालयाचे उपायुक्त श्रीमती दिपाली मुधोळकर व वरिष्ठ अधिकारी मुंढे मॅडम यांना मागण्याचे निवेदन सादर केले. यावेळी त्यांनी दहा दिवसापर्यंत निर्णय देण्यात येईल, असे आश्वासन मोर्चातील शिष्टमंडळाला दिले.या मोर्चाला प्रमुख उपस्थिती म्हणून समाजनेते दत्ताभाऊ सुरवसे, बाळासाहेब बळवंतकर, माजी मंत्री दशरथ भांडे, सौ.गीतांजलीताई कोळी, महादेव व्हंकळी, रमेश पीठ्ठलवाड, मदन शिरसाठ, समाधान पाटील, ड.रमेश तारू, सुभाष कांबळे, डॉ.मनोहर कोळी, राहुल बळवंत, प्रताप आमले, किसन ठोंबरे, अण्णासाहेब फुनगे, माधव बुधवारे, भीकाभाऊ सोनवणे, भाऊराव बागुल, नांदेड जिल्ह्यातून लक्ष्मणराव नागरवाड, माधव रेडेवाड, मारोती बिच्चेवाड, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच.मिसलवाड, शंकर तमनवाड, आनंदा रेजीतवाड, सौ.मैनावती माधव रेडेवाड, केरबा जेठेवाड, बाळासाहेब उलगूलवाड, उत्तरवाड, परभणीचे प्रा. रमेश पीठ्ठलवाड, गणेश सुर्यवंशी, मोहित रेडेवाड यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

# खारपाले , जुई अब्बास , कासु , आंबटेम येथे विविध विकासकामांचे भुमीपुजन .

गडब / सुरेश म्हात्रे

खारपाले येथे शिहु जिल्हा परिषद मतदार संघामध्ये आमदार अनिकेतभाई तटकरे ह्यांच्या शिफारशी नुसार खारपाले अंतर्गत रस्ता कामाचे भूमिपूजन पेण विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष नरेंद्र ठाकूर ह्यांचे हस्ते संपन्न झाला यावेळी प्रमुख पाहुणे ,पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष दयानंद भगत , जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, परशुराम मोकल जिल्हा सरचिटणीस,सचिव नरेंद्र म्हात्रे, पेण तालुका युवक अध्यक्ष विकास पाटील , जिल्हा उपाध्यक्ष उदय जवके, सरचिटणीस परशुराम मोकल,शिहु जिल्हा परिषद मतदारसंघ अध्यक्ष प्रमोद तांडेल, माजी जिल्हा परिषद सदस्य गजानन बोरकर, शांताराम बोरकर पेण विधानसभा संघटक डोलवी पंचायत समिती अध्यक्ष प्रितम केणी धावजी तुरे ,सुरेश शिंदे, प्रीतम केणी कमलाकर म्हात्रे संदेश मोकल निलेश पाटील दिनेश पाटील आशिष पाटील परशुराम पाटील प्रभाकर मोकल जगदीश पाटील अनिकेत मात्रे गजानन मोकल धनंजय म्हात्रे पांडुरंग पाटील संतोष म्हात्रे मोहन पाटील रामभाऊ मोकल व इतर ग्रामस्थ उपस्थित होते . निलेश पाटील. पेण तालुका सोशल मिडियाचे उपाध्यक्ष सुरेश म्हात्रे . जनार्दन म्हात्रे झावरे, मयूर शिंदे, शिंदे, राजेश सुर्वे, आणि असंख्य पदाधिकारी उपस्थित होते सदस्य,आदी पदाधिकारी यावेळी पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर तालुका अध्यक्ष दयानंद भगत ह्यांची भाषणे झाली






मुदखेड /प्रतिनिधी

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी, नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड अणि मुदखेड नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ निमित्त महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान उत्साहात पार पडले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी.शिंदे यांच्या प्रेरणा व मार्गदर्शनातून हा कार्यक्रम घेण्यात आला. या अभियानासाठी सौ. प्रिया डहाळे, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती मुदखेड या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्साहपूर्वक मतदानाची शपथ घेतली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. डी. एच. मेहेत्रे यांनी केले. त्यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र मतदाराने मतदान करणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख डॉ.अर्जुनसिंह ठाकुर तर आभार डॉ.संदीप कोरडे यांनी मानले.महाविद्यालयाच्या वतीने या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी यात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## १४ नोव्हेंबर : बालदिन आणि जागतिक मधुमेह दिन

# आरोग्यदायी बालपण म्हणजेच सशक्त राष्ट्र


बीड /प्रतिनिधी

१४ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी आणि जगासाठी दुहेरी अर्थाने विशेष आहे. भारतात हा दिवस पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन म्हणून साजरा केला जातो आणि त्याच वेळी जगभर हा दिवस जागतिक मधुमेह दिन म्हणून पाळला जातो. या दोन्ही दिनांच्या संगमातून एक अतिशय महत्त्वाचा संदेश मिळतो तो म्हणजे बालपणापासूनच आरोग्याची सवय म्हणजे मधुमेहमुक्त जीवन.

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना मुलं अत्यंत प्रिय होती.ते म्हणायचे, आजची मुलं म्हणजे उद्याचे नागरिक. त्यांच्या मते मुलांमध्ये असलेली निरागसता , कल्पकता आणि प्रामाणिकपणा हीच देशाच्या भविष्यातील खरी ताकद आहे. म्हणूनच त्यांच्या जन्मदिनी १४ नोव्हेंबरला भारतात बालदिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली. या दिवशी शाळांमध्ये विविध उपक्रम,नाटिका, खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. मुलांच्या शिक्षणाचा ,आरोग्याचा आणि हक्कांचा विचार या दिवशी केंद्रस्थानी असतो. परंतु आजचा बालदिन केवळ आनंदाचा दिवस नसून , आत्मपरीक्षणाचाही दिवस आहे. कारण आधुनिक काळातील मुल शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या नव्या आव्हानांना सामोरे जात आहेत.या निमित्ताने एक गाणं मनात पाझरतं.बच्चे मन के सच्चे, सारी दुनिया के अच्छे बच्चे हैं भगवान का रूप बच्चे हैं नूर का धूप हे गाणं केवळ भावनिक नव्हे तर सामाजिक जबाबदारीची आठवण करून देतं. मुलांमध्ये भविष्यासाठीची बीज असतात त्यांच आरोग्य , आनंद आणि सुरक्षा हेच आपल्या राष्ट्रनिर्मितीच मूळ आहे.

दुसरीकडे , १४ नोव्हेंबर हा जागतिक मधुमेह दिनही आहे . या दिवशी इन्सुलिनचे शोधक डॉ. फ्रेडरिक बँटिंग यांचा जन्म झाला होता . त्यांनी १९२१ मध्ये इन्सुलिनचा शोध लावून जगभरातील लाखो रुग्णांचे प्राण वाचवले. या दिवसाचा उद्देश आहे. मधुमेहाबद्दल जनजागृती , प्रतिबंध आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार.आज भारतात मधुमेहाचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. आंतरराष्ट्रीय मधुमेह महासंघाच्या अहवालानुसार , भारतात सुमारे १०१ दशलक्ष ( १०.१ कोटी ) लोकांना मधुमेह आहे. म्हणजे जवळपास प्रत्येक दहापैकी एक भारतीय मधुमेहग्रस्त आहे. त्यापैकी सुमारे ६० टक्के लोकांना आपल्या आजाराची कल्पनाच नाही.१९९० मध्ये दर एक लाख लोकांमागे १६२.७४ नवीन रुग्ण होते तर २०२१ मध्ये हे प्रमाण २६४.५३ वर पोहोचले आहे.जवळपास दुपटीहून अधिक वाढ.

महाराष्ट्रातही ही स्थिती चिंताजनक आहे.शहरी भागात मधुमेहाचे प्रमाण सरासरी १४ ते १५ टक्के आहे तर ग्रामीण भागात १० ते




१२ टक्के.एका आरोग्य सर्वेक्षणानुसार राज्यात २.०२ कोटी लोकांची तपासणी झाली आणि त्यापैकी १०.९ लाखांना मधुमेह असल्याचे नव्याने निदान झाले . दुसऱ्या अहवालानुसार सुमारे ६० लाख लोक महाराष्ट्रात मधुमेहग्रस्त आहेत आणि त्यापैकी ७० टक्के लोकांना आपल्या आजाराची माहितीच नाही.या आकडेवारीकडे पाहता स्पष्ट होते की , मधुमेह हा आता केवळ वयस्क किंवा शहरी लोकांचा आजार राहिलेला नाही . आहारातील बदल , कमी शारीरिक हालचाल , जंक फूडचा अतिरेक , झोपेचा अभाव आणि वाढलेला तणाव यांमुळे मुल , किशोरवयीन तरुण आणि ग्रामीण भागातील नागरिकही मधुमेहाच्या विळख्यात अडकत आहेत .या पार्श्वभूमीवर बालदिन आणि मधुमेह दिन यांचा एकत्र विचार करणे अत्यावश्यक आहे .

बालपणापासूनच जर संतुलित आहार , दररोज खेळण किंवा व्यायाम , तणावमुक्त वातावरण आणि नियमित तपासणी या गोष्टींचा आग्रह धरला , तर मधुमेहासारख्या आजारांच प्रतिबंधात्मक संरक्षण सहज शक्य आहे.घरात पौष्टिक अन्न दिलं गेल पाहिजे, शाळांमध्ये क्रीडेला प्रोत्साहन मिळालं पाहिजे , मुलांना निसर्गाशी जोडलं पाहिजे . समाजाने आणि शासनाने मिळून या दिशेने पावलं उचलणं आवश्यक आहे. फिट इंडिया मोव्हमेंट , आयुष्मान भारत आणि पोषण अभियान सारख्या सरकारी उपक्रमांना सामाजिक पाठिंबा मिळणं ही काळाची गरज आहे.

या १४ नोव्हेंबरला आपण सर्वांनी ही प्रतिज्ञा घ्यावी, मुलांना जंक फूडपासून दूर ठेवू , रोज त्यांच्यासोबत खेळू , आरोग्यविषयक शिक्षणाला प्राधान्य देऊ आणि समाजात निरोगी जीवनशैलीचा आदर्श निर्माण करू . कारण आरोग्यदायी बालक म्हणजेच निरोगी भारत . आणि निरोगी भारतच खऱ्या अर्थाने सक्षम , समृद्ध आणि आत्मनिर्भर होईल.

१४ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला दोन अमूल्य धडे देतो. एक , बालपण जपा आणि दुसरा , आरोग्याचे रक्षण करा . पंडित नेहरू म्हणायचे , मुलांमध्ये भविष्य पाहा . ते भविष्य उज्वल आणि निरोगी ठेवायच असेल , तर आजपासूनच आरोग्यदायी जीवनशैली स्वीकारण आवश्यक आहे . बालपण जर निरोगी असेल, तर राष्ट्र सशक्त होते.आणि सशक्त राष्ट्रच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा अर्थ समजते.

शब्दांकन...
चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार, बीड

# मागासवर्गीय विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती प्रकरणी अ‍ॅट्रॉसीटी नुसार कारवाई करण्याची दीपक कांबळे यांची मागणी

प्रतिनिधी @ केज

केज तालुक्यातील लव्हुरी येथील श्री. बडेबाबा विद्यामंदिरच्या मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली गेली नाही त्या प्रकरणी संस्थेची चौकशी करून दोषींवर ट्रॉसिटी नुसार कारवाई करण्याची मागणी रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांनी केली आहे. दरम्यान या संस्थेच्या गैरकारभाराची चौकश करण्याच्या मागणीसाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ हे मागील तीन दिवसा पासून आमरण उपोषणाला बसले अडून आज उपोषणाचा चौथा दिवस आहे. उपोषणार्थीची प्रकृती खालावलेली आहे. मात्र उपोषणाचा चौथा दिवस सुरू आद्यप एकही अधिकारी फिरकलेला नाही किंवा उपोषणार्थीची जबाबदार अधिकारी व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी भेट घेतली नसुन संस्थेची चौकशी झालेली नाही.

या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील श्री बडेबाबा विद्यामंदीर लहुरी शाळेत विषय शिक्षकांची ५ पदे मागील ८ वर्षा पासुन रिक्त आहेत. ती रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी. त्यामुळे ८ वर्ष झालेल्या विद्यार्थ्यांच्या नुकसानासाठी जबादार असणाऱ्या संस्थेवर कार्यवाही करावी. मागील ८ वर्षापासुन शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांची गणुवत्ता ढासळलेली आहे. शिक्षकांची व विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात यावी. या बाबत ग्रामसभेने सुद्धा ठराव घेतला आहे. सोबत जोडला आहे. श्री. बडेबाबा शिक्षण प्रसारक मंडळ यांनी जागेचे बनावट व खोटे कागदपत्रे बनवुन शाळेने व संस्थेने शासनाची फसवणूक केलेली आहे. त्यांची चौकशी करून संबधीत दोषींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. शाळेच्या जागेचे शासना कडुन भाडे घेण्यात येत आहे. त्याच जागेचे मालक म्हणून मंगलबाई संपत खांडेकर यांनी शासनाचा पिक विमा योजनेचा लाभ घेवुन शासनाची दुहेरी फसवणुक केलेली आहे. त्या बाबतीत सखोल चौकशी करुन दोषींवर कार्यवाही करण्यात यावी. शाळेची इमारत ही खाजगी व्यक्तीच्या नावे आहे. या इमारतीस नियमा प्रमाणे शासनाकडुन नियमित भाडे मिळत आहे; परंतु इमारत ही अत्यंत जीर्ण झालेली असुन भिंतीस भेगा पडलेल्या आहेत. तिथे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका होऊ शकतो. त्या बाबतीत संबधीत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात यावे. इमारत धोकेदायक असल्याने शाळा दुसऱ्या जागेत स्थलांतरीत करण्यात यावी. सन २०१८ पासुन मागासवर्गीय शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना देण्यात आलेली नाही. याच्यामध्ये दोषीवर कार्यवाही करून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करण्यात यावी. नारदस्वामी विद्यामंदीर, बीड येथे कार्यरत असलेले शाळेचे सेवक गणेश बजरंग इतापे यांना सेवाजेष्ठते नुसार लिपीक पदावर नियुक्ती देणे आवश्यक असताना श्रीमती तनुजा दाबेकर यांची बेकायदेशीर केलेली नियुक्ती रद्द करण्यात यावी.

या मागण्यासाठी धर्मवीर छत्रपती संभाजीराजे शौर्य प्रतिष्ठाणचे संस्थापक अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप चाळक आणि ग्रामस्थ हे दि. १० नोव्हेंबर रोजी बडेबाबा विद्यामंदिर लव्हुरी येथील बडेबाबा विद्यामंदिर समोर आमरण उपोषणाला बसले आहे. उपोषणाचा दोन दिवस संपले असून आज उपोषणाचा तिसरा दिवस आहे.



अनुसूचित जाती जमातीचे या विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवणाऱ्या संस्थाचालक आणि अधिकारी यांच्यावर ट्रॉसिटी नुसार कारवाई करण्यात यावी. अन्यथा रिपाइंच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.

-दीपक कांबळे,
तालुकाध्यक्ष, केज

# खर्डा शहरातील लाईटचा प्रश्न कायमस्वरूपीचा लागणार मार्गी

प्रतिनिधी @ खर्डा

खर्डा व परिसरातील नागरिकांना अनेक दिवसांपासून भेडसावत असलेल्या वीज समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी आज दुपारी माननीय रवी दादा सुरवसे संपर्क कार्यालयात बैठक घेण्यात आली.या बैठकीस एम.एस.ई.बी. मेंटेनन्स ठेकेदार अक्षय काळे, एम.एस.ई.बी.चे कर्मचारी केदारे साहेब, वनवे, जायभाय घाडगे, अशोक निंबोडे, सुरवसे, तसेच ग्रामपंचायत कर्मचारी सुदाम होडशीळ उपस्थित होते.या वेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे साहेब यांनी दूरध्वनीद्वारे एम.एस.ई.बी.चे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर बिडकीन साहेब यांच्याशी संवाद साधला.खर्डा आणि परिसरातील नवीन डीपी बसविणे, वीजपुरवठा सुरळीत ठेवणे व



देखभालकामे रवी दादा सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.बैठकीत खालील निर्णय घेण्यात आले -कातुरे डीपी येथे २०० केव्ही क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर दोन दिवसांत बसविण्यात येईल.टेलिफोन डीपी आणि किल्ला डीपी या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी २०० केव्हीचे ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे नियोजन करण्यात आले.तसेच खर्डा जिल्हा परिषद गटातील ज्या ठिकाणी वीजपुरवठा व दुरुस्तीची आवश्यकता आहे, त्या सर्व कामांना चार दिवसांत प्रारंभ करण्यात येईल, अशी माहिती ठेकेदार अक्षय काळे यांनी दिली.

या बैठकीस खर्डा आणि परिसरातील शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने तसेच ग्रामपंचायत महालिंग कोरे महेश दिंडोरे गणेश शिंदे राजु मोरे, सातेफळ चे सरपंच गणेश लटके, बापूसाहेब ढगे, जितू पगारे, नितीन सुरवसे,उपस्थित होते.बैठकीच्या शेवटी सर्वांनी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे साहेब व माजी सभापती रवी दादा सुरवसे यांच्या पुढाकाराचे मनःपूर्वक आभार मानले.

# जैन मंदिर: काळे यांचे पुण्यात धरणे आंदोलन; ताबा न सोडल्यास प्राणांतिक उपोषण करणार

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

अहिल्यानगरमध्ये श्री ऋषभ संभव जीन जैन श्वेतांबर संघ (जैन मंदिर) ट्रस्टचा भूखंड हडप करत मंदिर, प्रवचन स्थळ पाडून त्या ठिकाणी राजकीय पक्षाचे कार्यालय थाटल्याचा आरोप ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केला आहे. या प्रकरणात तक्रार करूनही कोणतीही कारवाई न झाल्यामुळे काळे यांनी पुण्यात सह धर्मदाय आयुक्त कार्यालयासमोर बुधवारी एक दिवसीय धरणे आंदोलन केले.




याबाबतचे अनेक कायदेशीर पुरावे, मनपाचे दस्तऐवज त्यांनी माध्यमांद्वारे समाजा समोर आणले. खासदार सुप्रिया सुळे, खासदार नीलेश लंके, माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी देखील काळे यांच्या कारवाईच्या मागणीचे समर्थन केले आहे. हडप केलेला संपूर्ण भूखंड खाली करून तो तत्काळ ट्रस्टला हस्तांतरित करावा, या कारवाई साठी विशेष व्यक्तीची नेमणूक करावी, ट्रस्टने धर्मदायीची कोणतीही पूर्व परवानगी न घेता, तसेच देणगीदाराच्या मृत्युपत्रातील अटी शतचे उल्लंघन करून बेकायदेशीररीत्या संबंधित जागेत भाडेकरू ठेवला आहे.

याप्रकरणी सर्व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशा मागण्या आंदोलनावेळी काळे यांनी केल्या. यावेळी जागेचा ताबा ट्रस्टला देण्याची कारवाई झाली नाही तर आंदोलन तीव्र केले जाईल. वेळप्रसंगी प्राणांतिक उपोषण करण्याचा इशारा काळे यांनी दिला आहे.

धमकावल्याचा आरोप

किरण काळे यांनी आता आक्रमक पवित्रा घेतला आहे. काळे म्हणाले, पुण्याच्या प्रकरणावरून अहिल्यानगरमध्ये मोर्चा निघाला. मात्र अहिल्यानगरमध्ये प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. काही समाज बांधवांनी या विषयाबाबत बैठक घेतली. मात्र त्याची माहिती समजताच लोकप्रतिनिधींनी त्यांना धमकावले. आर्थिकदृष्ट्या श्रीमंत असणाऱ्या मात्र स्वभावाने गरीब असणाऱ्या, व्यापारी समाजाचा आवाज सत्ता, दहशतीच्या जोरावर दाबला जात असल्याचे काळे म्हणाले

# पाथर्डी आगाराच्या अंदा धुंदीच्या कारभाराला कंटाळले प्रवासी- विष्णुपंत वाखुरे

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

पाथर्डी आगारातून सुटणाऱ्या लांब पल्ल्याच्या विशेषतः धार्मिक स्थळांवर सुटणाऱ्या गाड्या बंद केल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून नादुरुस्त झालेल्या गाड्या दुरुस्त करण्यावर सुद्धा अधिकाऱ्यांचे लक्ष नाही. याबाबत धरणे आंदोलन करण्याचा इशारा ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णुपंत वाखुरे यांनी दिला आहे. याबाबत माहिती देताना ते म्हणाले, पाथर्डी आगाराने तुळजापूर पंढरपूर अशा गाड्या जाणीवपूर्वक बंद करून भाविकांची गैरसोय चालवली आहे. अक्कलकोट गाडीला परवानगी येऊनही ती गाडी सुरू करण्यास टाळा टाळ केली जाते. मध्यंतरी बऱ्यापैकी सुधारणा झालेला कारभार आता पुन्हा ढासळला असून जीव मुठीत धरून जुनाट गाड्यांमध्ये प्रवाशांना प्रवास करावा लागतो. गाड्या कुठेही बंद पडतात. मराठवाड्यातील बसेस पाथर्डी मार्गे जात असल्याने लांबच्या प्रवाशांना जराशी सुविधा उपलब्ध होत असली तरी त्या गाड्यांमध्ये बसण्यासाठी जागा मिळत नाही. स्थानिक आगारातील नादुरुस्त गाड्यांची देखभाल व दुरुस्ती वेळेवर होत नसल्याने वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. आगाराच्या परिसरात राहणारे चालक वाहक सुद्धा बऱ्याचदा गाडीची वेळ निघून गेल्यानंतर निवांतपणे येतात. प्रत्येक एकादशीला अधिकाऱ्यांच्या हाता पाया पडून पंढरपूरला जाण्यासाठी गाडी मागावी लागते. आता आळंदीची यात्रा असून तालुक्यातील हजारो भाविक पंढरपूर व आळंदीला जातील. मात्र त्यांना जाण्यासाठी सोयीस्कर गाड्या नाहीत. उपस्थित कर्मचारी याबाबत समाधानकारक उत्तरे देत नाहीत. धार्मिक स्थळे गाड्या पाठवण्याबाबत शासनाकडून अग्रक्रम दिला जात असताना आगारातून मात्र अशा गाड्या जाणीवपूर्वक बंद केल्या जातात. अनेक वर्षांपासून शेगाव गाडीची मागणी पूर्ण केली जात नाही. सध्या तातडीने आळंदी व पंढरपूर साठी गाड्यांची आवश्यकता आहे. दुरुस्तीसाठी गाड्या कधी गेल्या , कधी येतील याची माहिती अधिकारी सांगू शकत नाहीत. वरिष्ठांनाही आगार व्यवस्थित चालावे याबाबत फारशी गंभीरतेने दखल घेतली जात नाही. पंढरपूर गाडी बाबत अनेक वर्षांपासून मागणी असून ही गाडी बंद का आहे अशी विचारणा कार्यालयाकडून झाल्यावर उत्पन्न अभावी बंद आहे असे सांगितले जाते. प्रत्यक्षात ज्या मार्गावर प्रवासी नसतात त्या मार्गावरून गाडी चालवले जाते. पूर्वीच्या मार्गावरून गाडी चालवल्यास तिला हमखास प्रवास मिळतील असे वाखुरे यांनी म्हटले आहे. यापूर्वी आगारातील चालू स्थितीतील काही गाड्या अन्य आगाराकडे वळविण्यात आल्या आता गाड्यांची टंचाई कधी दूर

# शिवसेनेवर २१, २२ जानेवारीला सलग २ दिवस होणार सुनावणी

## सुप्रीम कोर्टाने दोन्ही पक्षांना युक्तिवाद करण्यासाठी दिला ५ तासांचा अवधी




### २१, २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस सुनावणी

सुप्रीम कोर्ट यासंबंधी म्हणाले, या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात. पण प्रथम, शिवसेनेच्या प्रकरणात युक्तिवाद सुरू होतील. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या केसेस येतील. याचिकाकर्त्या पक्षाला युक्तिवादासाठी ३ तासांचा वेळ दिला जाईल. तर प्रतिवादींना २ तासांचा वेळ दिला जाईल.

दोन्ही पक्षांना युक्तिवाद पूर्ण करण्यासाठी व सोयीचे संकलन करण्यासाठी १ नोडल वकील नियुक्त करता येईल. या प्रकरणी २१ जानेवारी रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी होईल. त्यानंतर हे प्रकरण दुसऱ्या दिवशी म्हणजे २२ जानेवारी रोजीही ऐकले जाईल. याचा अर्थ या प्रकरणी २१ व २२ जानेवारी रोजी सलग २ दिवस या प्रकरणाची सुनावणी होणार आहे.

प्रतिनिधी @ नवी दिल्ली

शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत आज अखेर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. त्यात न्यायालयाने या प्रकरणी दोन्ही पक्षकारांना युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? अशी विचारणा करत त्यांची मते जाणून घेतली. त्यानंतर सुनावणी २१ जानेवारीपर्यंत लांबणीवर टाकली. कोर्टाने या प्रकरणी २१ व २२ असे सलग दोन दिवस सुनावणी होण्याचे संकेत दिलेत. त्यामुळे पुढच्या सुनावणीत न्यायालय दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून आपला निकाल देऊ शकते किंवा तो राखून ठेवू शकते. या सुनावणीवरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे राजकीय भवितव्य ठरणार आहे.

आज न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्या बागची यांच्या खंडपीठापुढे शिवसेना प्रकरणाची सुनावणी झाली. सुनावणी सुरू होताच कोर्टाने ठाकरे व शिंदे गटाला तुम्हाला युक्तिवादासाठी किती वेळ लागेल? याची विचारणा केली. त्यावर ठाकरे गटाचे वकील ज्येष्ठ विधिज्ञ देवदत्त कामत यांनी आपल्याला २ तास पुरेसे असल्याचे स्पष्ट केले. तर वकील डॉक्टर ए एम सिंघवी यांनी आपल्याला किमान ३ तास लागतील असे नमूद केले. त्यानंतर कोर्टाने या प्रकरणी काही मुद्दे एकमेकांशी जुळणारे असू शकतात असे नमूद करत सुनावणी २१ जानेवारीपर्यंत तहकूब केली.

शिवसेना पक्ष व चिन्हाबाबत आज अखेर सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीला सुरूवात झाली. त्यात न्यायालयाने या प्रकरणी दोन्ही पक्षकारांना युक्तिवादासाठी किती वेळ लागेल?

# बीड नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यास सुरुवात

## दोन दिवसांत ५२ अर्ज

बीड (प्रतिनिधी) : बीड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदांसाठी नामांकन अर्ज दाखल करण्यास आजपासून अधिकृत सुरुवात झाली आहे. निवडणुकीच्या तयारीला वेग आला असून, पहिल्या दोन दिवसांत एकूण ५२ अर्ज दाखल झाले आहेत. यापैकी ५१ अर्ज ऑनलाइन तर एक अर्ज ऑफलाइन दाखल करण्यात आला आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी सौ. जाधव यांनी दिलेल्या माहितीनुसार, महापौर आणि नगरसेवक पदांसाठी इच्छुक उमेदवार आणि विविध पक्षांचे संभाव्य उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी पुढे येत आहेत. बहुतांश



उमेदवार अंतिम दोन दिवसांत आपले अर्ज सादर करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्याच्या स्थितीत दाखल झालेल्या ५१ ऑनलाइन अर्जांची हार्डकॉपी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. हार्डकॉपी सादर न झाल्यास अर्ज अधिकृतरीत्या ग्राह्य धरला जाणार नाही, असेही जाधव यांनी स्पष्ट केले.

नामांकन अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया आगामी काही दिवसांत आणखी वेग घेणार असून, शेवटच्या दोन दिवसांत मोठ्या संख्येने उमेदवार अर्ज दाखल करतील, असा अंदाज वर्तवला जात आहे. बीड नगरपरिषदेच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# शेवगाव शहरात प्लास्टिकचा वाढता कहर; नगरपरिषद बेफिकीर, पर्यावरण धोक्यात

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव शहरामध्ये प्लास्टिकचा वापर दिवसेंदिवस वाढत असून, शहराच्या सौंदर्यावर तसेच पर्यावरणाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. नगरपरिषदेकडून प्लास्टिकबंदीची अंमलबजावणी केवळ कागदावरच राहिली असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत राबवण्यात आलेले प्रयत्न केवळ औपचारिकतेपुरतेच मर्यादित राहिल्याने शहरातील स्वच्छतेची अवस्था बिकट झाली आहे. रस्त्यांच्या कडेला, बाजारपेठांमध्ये आणि चहाच्या टपऱ्यांजवळ ठिकठिकाणी प्लास्टिकचा कचरा साचलेला दिसतो.रस्त्यावर भटक्या जनावरांकडून या कचऱ्यातील प्लास्टिकसोबत अन्न खाल्ले जात असल्याने त्यांच्या आरोग्यावर गंभीर



परिणाम होत आहेत. पोटात प्लास्टिक साचल्याने अनेक जनावरे मृत्यूमुखी पडत असल्याची धक्कादायक स्थिती निर्माण झाली आहे.

शहरातील गटारे आणि नाले प्लास्टिकमुळे तुंबले असून, पाण्याचा निचरा होत नाही. परिणामी पावसाळ्यात डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू आणि मलेरियासारख्या रोगांचा धोका निर्माण झाला आहे.प्लास्टिकबंदीबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी नगरपरिषदेकडून कोणतीही मोहीम, रॅली किंवा जाहिरात मोहीम राबवण्यात आलेली नाही. किरकोळ दुकानदार व फेरीवाले खुलेआम प्लास्टिक पिशव्यांचा वापर करत असून, त्यांच्यावर कारवाई न झाल्याने प्रशासनावरील विश्वास ढळत आहे.

शहरातील कचरा संकलन व्यवस्था पूर्णतः विस्कळीत झाली आहे. प्लास्टिक वेगळे संकलित करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नसल्याने सर्व प्रकारचा कचरा एकत्र टाकला जातो. शहराच्या बाहेर असलेल्या कचरा डेपोवर प्लास्टिकचे प्रचंड ढीग साचले असून, तेथून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीमुळे नागरिक त्रस्त आहेत. काही ठिकाणी हा कचरा जाळण्यात येत असल्याने वायूप्रदूषणातही वाढ होत आहे.एकेकाळी नगरपरिषदेने प्लास्टिक वापरावर दंड आकारणीची मोहीम सुरू केली होती, मात्र ती आता पूर्णपणे थंडावली आहे. स्वच्छता विभागात मनुष्यबळाची कमतरता असल्याने नियमित साफसफाईही होत नाही.वारंवार तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये प्रशासनाबद्दल नाराजीचा सूर दिसून येतो. नागरिकांचा प्रश्न एकच - नगरपरिषद जागी कधी होणार?

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# विघ्न संतोषी लोकांकडून धानोरा रोडच्या विकास कामात अडथळा, बंद पाडलेले धानोरा रस्त्याचे काम तात्काळ सुरु करा

## संजय धुरंधरे यांची मुख्याधिकारी फडसे यांच्याकडे मागणी

बीड /प्रतिनिधी

धानोरा रस्त्यासाठी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या आदेशावरून जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. मात्र संबंधित रस्ता हा जेथे अवशक्त आहे तिथे न करता दुसरीकडेच चालू केला आहे असे कारण पुढे करत काही विघ्न संतोषी लोकांनी यामध्ये अडथळा आणला असून सदरील रस्त्याचे काम बंद पाडले आहे. सदरील विकास कामात अडथळा आणू नका,



बंद पाडलेले काम तात्काळ सुरु करा अशी विनंती बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे संजय धुरंधरे यांनी केली आहे.

बीड शहरापासून नजीक असणाऱ्या विविध गावांसह प्रभागांना जोडणारा मुख्य रस्ता म्हणून धानोरा रस्त्याचा उपयोग नागरिक दळणवळणासाठी करतात. याच रस्त्याला जोडून आता बीड रेल्वे स्थानक झाले आहे. सतत गर्दीचा आणि गरजेचा असलेल्या रस्त्याची काही वर्षापासून दयनीय अवस्था झाली होती. अनेक वर्षापासून विकासापासून वंचित असलेल्या या धानोरा रस्त्यासाठी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांनी निधी मंजूर करून दिला यामुळे या रस्त्याच्या कामाला चालना मिळाली आणि निधी मंजूर झाल्याने रस्ता काम सुरू करण्यात आले. त्याचे कार्यारंभ आदेश ही पारित झाले आणि सदरील विकास काम पोलीस मुख्यालया पासून सुरू करण्यात आले मात्र रस्त्याचे खोदकाम सुरू असताना काही विघ्न संतोषी लोकांनी हे काम विरुद्ध दिशेने करा अशी मागणी करत अनेक वर्षापासून विकासापासून वंचित असलेले धानोरा रस्त्याचे विकास काम बंद पाडले आहे. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध नोंदवण्यात येत असून बंद पाडलेले रस्त्याचे काम तात्काळ सुरू करा अशी मागणी संजय धुरंधरे यांनी बीड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे यांच्याकडे केली आहे.

# सेवारत सैनिक श्री वायभासे अविनाश आदिनाथ यांचे शाही इतमामात अंतिमसंस्कार संपन्न

बीड /प्रतिनिधी

सेवारत सैनिक लांस नायक वायभसे अविनाश आदिनाथ मु. पो. पिंपरी (घाट), तालुका- आष्टी, जिल्हा -बीड येथील रहीवाशी असुन देशाची सेवा करीत असतांना उपचारा दरम्यान कमांड हॉस्पीटल पुणे येथे दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे राहते गावी पिंपरी घाटा येथे दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी त्यांचा अंतिम संस्कार शाही इतमामात करण्यात आला.



यावेळी पोलीस खात्या तर्फे गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला तसेच प्रशासनातर्फे तहसीलदार आष्टी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, पोलीस निरीक्षक अंभोरा पोलीस स्टेशन यांनी मानवंदना दिली. श्री अविनाश वायभासे यांची सेनेतील सेवा १५ वर्ष झाली होती ते कमांड हॉस्पीटल पुणे येथे उपचारार्थ दाखल होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या परीवारात त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी व आई वडील आहेत.

# पूर्णवादी नागरी सहकारी बँकेत ॲड. अक्षय मुळे यांची विधी सल्लागार म्हणून नियुक्ती

बीड /प्रतिनिधी

पूर्णवादी नागरी सहकारी बँक, बीड यांनी आपल्या मुख्य शाखेसाठी ॲडव्होकेट अक्षय विश्वंभर मुळे यांची विधी सल्लागार म्हणून तीन वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती केली आहे. ही नियुक्ती १ नोव्हेंबर २०२५ पासून लागू झाली आहे.बँकेच्या संचालक मंडळाच्या दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या सभेत हा ठराव संमत करण्यात आला असून त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकृत पत्र जारी केले आहे. ही नियुक्ती सहकारी संस्थांचा कायदा १८८१ कलम १३८ आणि संबंधित प्रशासकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार करण्यात आली आहे.ॲड. मुळे



हे बँकेच्या सर्व विधी विषयक कामकाजावर सल्ला देणार असून, न्यायालयीन प्रकरणे, कागदपत्रे तसेच कायदेशीर मार्गदर्शन या क्षेत्रात जबाबदारी पार पाडतील. बँकेच्या व्यवस्थापनातर्फे त्यांना आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.




# भोकर नगराध्यक्ष पदासाठी पहिले नामनिर्देशन पत्र चंद्रकांत स्वामी मुस्तापुरे कडुन दाखल

भोकर /प्रतिनिधी

भोकर नगरपरिषद निवडणुकीचे पहिले नामनिर्देशन पत्र नगराध्यक्ष पदासाठी अपक्ष उमेदवार चंद्रकांत स्वामी मुस्तापुरे यांना दाखल केले. यामुळे त्यांची उमेदवारी मतदारांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहे. भोकर नगरपरिषेदत मोठ्या प्रमाणावर लुबाडणूक चालु असुन या विरोधात रणसिंग पुकारण्यासाठी आता नगरपरिषदेची निवडणूक लढवत असल्याची माहिती उमेदवारी चंद्रकांत स्वामी मुस्तापुरे यांनी सांगितले. मी एक सामान्य नागरिक असुन जनतेला न्याय मिळावा, भोकर शहराच्या विकासासाठी मी निवडणूक लढवत असुन त्यामुळे मी सर्व प्रथम नामनिर्देशन पत्र. १.क्रमांक.असुन त्याचे प्रमाणे मतदान करुन विजयी करावे असे जनतेला उद्देशून चंद्रकांत स्वामी मुस्तापुरे यांनी केले आहे.

# अकोले तालुका सरपंच सेवा संघाच्या अध्यक्षपदी राजेंद्र गवांदे तर उपाध्यक्ष पदी डॉ.अनुप्रिता शिंदे

संगमनेर शिर्डी /प्रतिनिधी

सरपंच सेवा संघाच्या अध्यक्षपदी कळस बु चे सरपंच श्री राजेंद्र गवांदे तर उपाध्यक्षपदी सुगाव बुद्रुक च्या सरपंच डॉ. सौ.अनुप्रिता शिंदे, सचिवपदी गर्दनी च्या सरपंच सौ साधना अभंग, खजिनदार राजूर च्या सरपंच सौ पुष्पा निगळे यांची निवड झाली आहे. अकोले पंचायत समितीच्या सभागृहात आयोजित बैठकीत ही निवड करण्यात आली. कार्यकारणी सदस्य म्हणून सरपंच किरण गजे वाशेरे,गणपत डगळे खिरविरे,मुरलीधर मेंगाळ केळी रुम्हनवाडी, भास्कर बादड पाचनई, पंढरीनाथ खाडे बारी, रामचंद्र उघडे पांजरे, भास्कर खोकले पाचपट्टा, रवी मालुंजकर रुंभोडी, अनंत रामभाऊ पावडे खुंटेवाडी, भारती चासकर





बहिरवाडी, कविता मधे चिचोंडी, कविता घिगे शेलद, रोहिणी बगाड पाडाळने, मनिषा चौधरी धामणवण, सुनंदा गावंडे मुथाळने, सुरेखा शेळके चास, रामकृष्णहरी आवारी धामणगाव आवारी आदींची निवड करण्यात आली.

सर्व नवनिर्वाचित अध्यक्ष व कार्यकारणी चे गटविकास अधिकारी अमर माने यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सरपंच संघाचे महाराष्ट्र राज्याचे नेतृत्व बाबासाहेब पावसे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन पत्राद्वारे नियमित केले आहे. येणाऱ्या काळात अकोले तालुक्यातील सरपंचांचे अनेक प्रश्न आहेत ये शासन दरबारी मांडून ते सोडविण्याचा प्रयत्न करणार

# बेलवाडी मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी भक्त गणपत आप्पा खुर्शे यांनी दिला धनादेश

परळी /प्रतिनिधी

श्री संत गुरुलिंग स्वामी मंदिर (बेलवाडी) येथे बांधकाम एक रूम जर्णोद्धार साठी कै. श्री गणपतअप्पा संतोबा खुर्शे यांच्या स्मृतीपित्यर्थ ग.भा. प्रयागबाई गणपतआप्पा खुर्शे यांच्याकडून एक रूम बाधकामासाठी (रू.३५१०००) तीन लाख एकावन हजार रुपये देणगी स्वरूपात चेक मंदिरास सुपूर्द करण्यात आला.

यावेळी श्री संत गुरुलिंग स्वामी मंदिराचे अध्यक्ष श्री दत्तात्रयआप्पा ईटके गुरुजी, सचिव श्री गिरीशआप्पा चौधरी,श्री



वक्रेश्वर मंदिर अध्यक्ष श्री सोमनाथआप्पा हालगे, श्री हि.टी.साखरे गुरुजी, महाराष्ट्र वीरशैव सभा तालुका अध्यक्ष महादेव ईटके, वीरशैव विकास प्रतिष्ठान सहसचिव विकास हालगे, कै.गणपतआप्पाखुर्शे यांची कन्या वनमलाताई शेटे, श्री संतोष अक्कनवरु (लातूर), श्री अमोल हुडगे(उदगिर), सौ.आशु संतोष अक्कनवरु, सौ. श्रीदेवी राघोव, सौ.मनीषा उदगिरे, मनोज किनकर, गणेश स्वामी आदी उपस्थित होते.

# काही गोष्टी बोलून दाखवायच्या नसतात करून दाखवायच्या असतात इंद्रानगर प्रभात क्र१ मध्ये स्वच्छता मोहीम सुरू विकास पुरुष इजरान भैय्या कुरेशी

परतूर /प्रतिनिधी

परतूर नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्र १ सर्वाधिक चर्चेत असलेला नाव म्हणजे इजरान कुरेशी प्रभाग क्र १ मध्ये सध्या इजरान कुरेशी हे नाव जोरदार चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे तसेच काय नागरिकांना तर जनतेचा राजा म्हणून ओळखले निर्माण केली असल्याचा दिसून येत आहे काही दिवसापूर्वी एका तरुणांना सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाला आहे तो शेतात काम करून व्हिडिओमध्ये बोलत आहे की गोरगरिबाचा राजा म्हणजेच इजरान कुरेशी सुखा दुःखात साथ देणारा गोरगरीब जनता साठी मसीहा पक्षपाती जात भेद न पाहता हे सर्वपलीकडे एकमेव राजा म्हणजे ते इजरान भैय्या कुरेशी आहे असा व्हिडिओ सोशल मीडियावर वारं होत आहे तसेच नगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र१ उमेदवार म्हणून त्यांनी राजकारण आखाडच्यात उडी मारली असल्याची जोरदार चर्चा ऐकायला भेटत आहे तसेच प्रभाग क्र१ मध्ये सामान्य नागरिकाला विचारला असताना त्यांनी काही सांगण्याच्या अगोदर त्यांनी आमच्या प्रतिनिधीला हे शब्द सांगितलेले आहे की जिद्दीचा ज्वालामुखी म्हणजे तरुणाई, अन्यायाविरुद्ध उठली की सत्ता थरथर कापते.

हेच तरुणाईचं अस्त्र आहे.



काही गोष्टी बोलून दाखवायच्या नसतात करून दाखवायच्या असतात इंद्रानगर प्रभात क्र१ मध्ये स्वच्छता मोहीम सुरू विकास पुरुष इजरान भैय्या कुरेशी इजरान भैय्या कुरेशी हेच आमचा नगरसेवक म्हणून येणार असल्याचा त्यांनी नाव नाही सांगण्याच्या अटीवर आमच्या दैनिक दंडधिकार पेपरच्या माध्यमातून सांगितलेला आहे तसेच इजरान कुरेशी यांनी प्रभाग क्रम१ मध्ये स्वतः खर्चाने पाणी पाईपलाईन दुरुस्ती स्वच्छता मोहीम घरासमोर पसरलेली अस्वच्छ नाली उपासने सर्व प्रकारचे काम त्यांनी स्वतः खर्चाला केलेली आहे नागरिकांना लागणारे मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी ते दिवस-रात्र

# इंदुरीकर महाराज कुटुंबाला नाव ठेवणाऱ्याने आपली लायकी तपासावी हिंदू धर्मभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील

जाफराबाद /हरी भालके

जाफराबाद तालुक्यातील टेंभुर्णी या गावी संत रंगनाथ महाराज उर्फ आत्मानंद सरस्वती यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताह किर्तन महोत्सव व भागवत कथा ज्ञानज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून त्यामध्ये गोरक्षण समिती प्रदेशाध्यक्ष हिंदू धर्माभूषण श्री नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांचे मार्गदर्शन प्राप्त झाले त्यानिमित्ताने संत आणि ग्रंथ आपले केंद्रबिंदू आहे ज्ञानोबा तुकोबा सारखे संत नाही गीता भागवतासारखा ग्रंथ नाही आणि वारकरी संप्रदायासारखा सांप्रदाय जगात नाही तुम्ही संत मायबाप कृपावंत काय मी पतीत कीर्ती वाणू त्यांचा अवतार जड जीवांचा उद्धार करण्यासाठी असतो त्यासाठी समाज प्रबोधन महत्त्वाची पायरी आहे मंडळी आत्ताच मागच्या आठवड्यामध्ये महाराष्ट्राचे प्रसिद्ध समाज प्रबोधन कीर्तनकार ह भ प निवृत्ती महाराज इंदुरीकर बाबा यांच्या मुली चा साखरपुडा कार्यक्रम पार पडला त्यामध्ये महाराजांनी कोणाचा ही वैयक्तिक सत्कार केला नाही जेवण बनवणारी मंडळी आणि वाढणारे वारकरी गणवेश यामध्ये ठेवले महाराष्ट्रीयन भोजन बनविले सोबतच एक लाख ११ हजार रुपये मुख्यमंत्री सहाय्यता निधीत पूरग्रस्त शेतकरी मायबापासाठी जमा केले आणि त्यांना तरीपण लाखो रुपये साखरपुड्यात खर्च केले म्हणून त्यांना आठवडाभरात ट्रोल करण्याचे काम सुरू आहे त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून सावकारी कर्ज काढून लग्न समारंभ करू नका साध्या पद्धतीने सुद्धा लग्न होऊ शकतात पण मी लाखोंचा खर्च केला यामध्ये वाईट काय आहे मुलीचा बाप या नात्याने तिच्या सुखासाठी मी कमावलेले धन जर शुभमंगल कार्यात खर्च केले तर वावगे काय आहे मंडळी खर्च महाराजांनी केला तेवढी त्यांची क्षमता आहे उगीचच दुसऱ्याचे पोट दुखण्याचे कारण नाही माझ्या कडून कोणाचे काही वाईट झाले असल्यास मला बोला माझ्या मुलीवरती कपड्यावरून कमेंट करू नका आणि




ते खरे आहे तो अधिकार आपला नाही कपडे नवरदेवाकडील मंडळी घेत असते मी नाही घेतले तरी पण मुद्दामहून इंदुरीकर कुटुंबाला बदनाम करण्याचे काम इंदुरीकर द्वेषी करीत आहे म्हणून इंदुरीकर महाराज कुटुंबाला नाव ठेवणार यांनी आपली लायकी सर्वप्रथम तपासा वि असे स्पष्ट मत गोरक्षण समिती महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राष्ट्रीय कीर्तनकार हिंदू धर्मभूषण साठी नंदकिशोर जी महाराज वायाळ पाटील यांनी यावेळी व्यक्त केले बाबांनी आतापर्यंत ती ४० वर्षापासून वारकरी संप्रदायाचे प्रामाणिकपणे सेवा केली असून प्रबोधनातून परिवर्तनाचे मोठे काम बाबांचे आहे खरं सांगायचे तर तमाशा , लावणीला जेवढी गर्दी राहत नाही तेवढी प्रचंड गर्दी महाराजांच्या कीर्तनाला असते महाराजांच्या कुटुंबापर्यंत बोलण्याचा अधिकार वैयक्तिक कोणाला नाही तरीसुद्धा महाराजांना मुलींच्या कपड्यावरून टारगेट मुद्दामहून केल्या जात आहे त्यांनी आतापर्यंत कीर्तनाच्या मानधनाच्या माध्यमातून गोशाळा आणि पाठशाळा मुलं घडविण्याचे मोठे काम स्वखर्चातून चालविले आहे जी दक्षिणा कीर्तनाची मिळते त्यातूनच शिक्षकांना पगार देऊन नवीन सुसंस्कृत पिढी घडविण्याचे काम इंदुरीकर बाबा आणि कुटुंब करीत आहे त्यामुळे कधीतरी चांगल्या कामाचे कौतुक करा फक्त निंदाच नको असेही हिंदू धर्मभूषण नंदकिशोर जी महाराज वायाळ यावेळी म्हणाले सोबतच निवृत्ती बाबांनी कीर्तनातून निवृत्ती घेऊ नये समाजाला व धर्म संस्कृती टिकून राहण्यासाठी आपण संप्रदायांमध्ये टिकून राहणे ही सुद्धा काळाची गरज असल्या चे वायाळ महाराज यावेळी म्हणाले आणि जर मुद्दामहून इंदुरीकर महाराज यांच्या कुटुंबाला त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास त्यावरती फौजदारी गुन्हा व मानहानीचा गुन्हा दाखल करून त्यांना लायकी दाखविण्याचे आव्हान देखील सांप्रदायामार्फत नंदकिशोर जी महाराज वाया ळ यांनी केले आणि सोबतच महाराजांना टारगेटच काय करता खरंतर त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार महाराष्ट्र शासनाने द्यावा म्हणजे खऱ्या वारकरी साधकाला न्याय मिळेल असे वैयक्तिक मतही याप्रसंगी व्यक्त केले सदरील कार्यक्रमासाठी मार्गदर्शक खलसे गुरुजी , उखर्डे साहेब, पिंपळे गुरुजी, शिवाजी महाराज वाघ, भागवताचार्य महाराज, मुळे गुरुजी, दयानंद दरबारचे विनायक गुरु, प्रदीप महाराज बनकर, विठ्ठल महाराज कापसे, निवृत्ती महाराज कोरडे, यादव महाराज निवडुंगा, कृष्णा महाराज कोल्हे यासह वारकरी मंडळी व भाविक भक्तांची मोठी उपस्थिती होती शेवटी संत रंगनाथ बाबा



# प्रतिष्ठान महाविद्यालयात पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत म्हणून साहित्याचे वाटप

पैठण / प्रतिनिधी

पैठण येथील प्रतिष्ठान महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या एका कार्यक्रमात महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पूरग्रस्त गरीब विद्यार्थी, विद्यार्थिनींना छोटीशी मदत म्हणून बॅग व ईतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी पुणे येथील आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास रामचंद्र उगले, प्रा.डॉ.अविनाश शेलार,रासयो कार्यक्रम अधिकारी मधुकर वाळूंज, प्रा.शंकर घाडगे या मान्यवरांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

प्रतिष्ठान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद सोनकांबळे उपप्राचार्य प्रा.वैजनाथ चाटे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम आधिकारी डॉ. सुभाष राठोड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या एका छोटेखानी कार्यक्रमात महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पूरग्रस्त भागातील गरजू विद्यार्थी व विद्यार्थिनींना छोटीशी मदत म्हणून बॅग व ईतर शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मदत म्हणून दिल्याबद्दल पुणे येथील आबासाहेब गरवारे कॉलेज चे विशेष अभिनंदन करण्यात आले.याकार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.विजयकुमार वैराटे यांनी तर आभार डॉ. हंसराज जाधव यांनी मानले.

# परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी पर्यंत

# नगराध्यपदासाठी १ तर नगरपरिषद सदस्य पदासाठी १० अर्ज दाखल

## शनिवारी उमेदवारी अर्ज भरता येणार, रविवारी सुट्टी

परळी (प्रतिनिधी)

नगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. १७ प्रभागांमधील ३५ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरू झाली असून सोमवारी (दि. १७) दुपार ३ पर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. दि. १३ नोव्हेंबर पर्यंत नगरपरिषद सदस्य पदाकरिता १० अर्ज आणि नगराध्यक्ष पदाकरिता १ असे एकूण ११ नामनिर्देशनपत्र परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणूक विभागात दाखल करण्यात आले आहेत. अर्ज दाखल करण्यासाठी शनिवारी उमेदवारी अर्ज भरता येणार आहे. तर रविवारी सुट्टी आहे अशी माहिती निवणूक विभागाकडून देण्यात आली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणूक- २०२५ साठीचा कार्यक्रम ४ नोव्हेंबर रोजी घोषित केला आहे. त्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. त्यामुळे नगरपरीषद कार्यक्षेत्रात आचार संहिता लागू आहे. येथील नगराध्यक्ष त्याचबरोबर १७ प्रभागांतील ३५ नगरसेवक पदांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरूवात झाली असून, नगरपालिकेच्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांच्या कक्षात अर्ज स्वीकारले जात आहे. १७ प्रभागांसाठी प्रत्येकी दोन अशा एकूण ३४ कर्मचारी तसेच नगराध्यक्ष पदासाठी दोन कर्मचारी व त्यांना साहाय्य करण्यासाठी १८ तलाठी नियुक्त आहेत. नामनिर्देशन पत्रासोबत अनामत रक्कम स्वीकारण्यासाठी स्वतंत्र दोन कर्मचाऱ्यांचीही नियुक्ती केली आहे.नगर परिषद क्षेत्रातील ७९,५६९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात ४१,०२३ पुरुष, ३८,५४३ महिला आणि ३ इतर मतदार आहेत. मतदानासाठी ८८ केंद्रे निश्चित केली आहेत. अर्ज दाखल दि. १० नोव्हेंबर पासून सुरुवात व अंतिम तारीख १७ नोव्हेंबर, छाननी १८ नोव्हेंबर, अर्ज मागे घेण्याची मुदत १९ ते २१ नोव्हेंबर, चिन्ह वाटप २६ नोव्हेंबर, मतदान २ डिसेंबर, आणि मतमोजणी ३ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता होईल. नगर परिषद निवडणुकीसाठी सोमवारपासून ऑनलाईन अर्ज भरणे सुरू झाले असून, त्या भरलेल्या अर्जाची एक प्रत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे द्यायची आहे. येथील नगर परिषदेच्या इमारतीमध्ये निवडणूक कक्ष तयार करण्यात आला आहे. निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी त्र्यंबक कांबळे,सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार व्यंकटेश मुंडे, नायब तहसीलदार परवीन पठाण, नायब तहसीलदार पंडित सुरवसे, नगर परिषद उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित आहेत. चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या लोकशाहीच्या उत्सवात सर्वांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे. परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक क्षेत्रातील संपूर्ण मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.

आता पर्यंत नगराध्यक्षपदासाठी १ तर नगरपरिषद सदस्यपदासाठी १० उमेदवारी अर्ज दाखल परळी नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाली असून, सोमवार दि. १० नोव्हेंबर रोजी एकही अर्ज प्राप्त नाही, मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्ष पदासाठी सय्यद रशिदाबी शफाकत अली यांचा अर्ज दाखल.

, प्रभाग क्रमांक ३ सर्वसाधारण महिला प्रवर्गातून सय्यद रशिदाबी शफाकत अली, प्रभाग क्रमांक १६ सर्वसाधारण प्रवर्गातून बागवाले कुशक कमलबाई यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला. बुधवार दि. १२ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्रमांक २- सर्वसाधारण प्रवर्गातून सय्यद जुबेर अली शफाकत अली, प्रभाग क्रमांक ३- सर्वसाधारण महिला प्रवर्गातून खान शाहीन नय्युम, प्रभाग क्रमांक १०- अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून पारधे दिपाली किशोर यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. गुरुवार दि. १३ नोव्हेंबर रोजी प्रभाग क्रमांक ६- सर्वसाधारण प्रवर्गातून लोखंडे दत्ता विष्णू, प्रभाग क्रमांक ८ - अनुसूचित जाती महिला प्रवर्गातून कांबळे नंदिनी विश्वजीत, प्रभाग क्रमांक- ८ सर्वसाधारण प्रवर्गातून आचार्य रवि किशन, प्रभाग क्रमांक ९-सर्वसाधारण महिला प्रवर्गातून शेख इरशाद रजियोद्दिन


आणि शेख यास्मीन बेगम शमशोद्दीन यांचा उमेदवारी अर्ज दाखल झाला असून आता पर्यंत दिनांक १३ नोव्हेंबर पर्यंत नगरपरिषद सदस्य पदाकरिता १० अर्ज आणि नगराध्यक्ष पदाकरिता १ असे एकूण ११ नामनिर्देशनपत्र परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणूक विभागात दाखल करण्यात आले आहेत. नगरपालिका निवडणुकीसाठी शनिवारीही उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा प्रशासनाकडे पत्र पाठवून सदर बाब स्पष्ट केली आहे १६ नोव्हेंबर रोजी रविवारी सुट्टीच्या दिवशी उमेदवारी अर्ज स्विकारले जाणार नाहीत असे स्पष्ट करण्यात आले आहे. राज्य निवडणूक आयोगाने तातडीने राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांना पत्र पाठविले आहे. यामध्ये शनिवारी १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत उमेदवारी अर्ज स्विकारले जावे अशा स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

### केज खरेदी -विक्री संघात सोयाबीन,उडीद व मुगाची

## ऑनलाईन नोंदणी करावी - बालासाहेब बोराडे

केज/प्रतिनिधी

केज तालुका खरेदी-विक्री संघ नाफेड अंतर्गत आधारभूत किमतीने सोयाबीन,उडीद व मूग खरेदी योजना २०२५ - २०२६ सुरु करण्यास परवानगी देण्यात आली आहे.या खरेदी केंद्रांतर्गत शेतकऱ्यांचे सोयाबीन, उडीद व मूग या पिकांची शासकीय हमीभावाने खरेदी होणार आहे याची ऑनलाईन नोंदणीप्रक्रिया खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात सुरु करण्यात आल्याची माहिती चेअरमन बालासाहेब बोराडे यांनी दिली आहे.



खरेदी-विक्री संघ शेतकऱ्याला त्यांच्या शेत मालाची वेळेवर खरेदी व्हावी व योग्य भाव मिळावा म्हणून खा. बजरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सतत क्रियाशील व प्रयत्नशील राहिलेला आहे.प्रतिवर्षा प्रमाणे याहीवर्षी शासनाने हमीभावाप्रमाणे खरेदी केंद्र सुरु करण्यास परवानगी दिली आहे.या शासकीय खरेदी केंद्रावर सोयाबीनला ५३२८ रुपये मूग ७८०० रुपये तर उडीद ८७६८ रुपये प्रति क्विंटल हा हमीभाव निश्चित करण्यात आला आहे.ऑनलाईन नोंदणीसाठी ७/१२,८ अ उतारा(ई पीकपाहणीसह), आधारकार्ड,बँक पासबुक घेऊन संबंधित शेतकरी बांधवाने नोंदणीसाठी उपस्थित राहणे बंधनकारक व अनिवार्य आहे.नोंदणीची अंतिम तारीख ३१ डिसेंबर असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली

तसेच प्रत्यक्ष खरेदी १५ नोव्हेंबर पासून सुरुहोणार असल्याने जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन चेअरमन बालासाहेब बोराडे,व्हाईस चेअरमन दत्तात्रय (पिंटु) ठोंबरे यांच्यासह सर्व संचालक मंडळाने केले आहे.




## केज तालुक्यात संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक!

केज/प्रतिनिधी

संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट रचण्यात आला होता त्यानंतर जरांगे पाटील यांनी नार्को टेस्ट करण्यासाठी अर्ज देखील केला आहे तसेच मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे की, नार्को टेस्ट मध्ये काय दुध का दुध पाणी का पाणी एकदा कळेलच परंतु सहा कोटी मराठा समाज संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांना देव मानत आहे व त्यांना जिवे मारण्याचा कट रचणे म्हणजे सहा कोटी मराठा समाजाला मारल्यासारखे आहे व तसेच परळी तालुक्यात धनंजय मुंडे समर्थकाकडुन संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेची विटंबना केली त्यांचा निषेध व्यक्त करत घोषणाबाजी करत संघर्ष योध्दा मनोज दादा जरांगे पाटील चौक केवड येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करण्यात आला आहे.यावेळी केज तालुक्यातील चिंचोली माळी,केवड,वरपगाव, प्रींप्री,काळेगाव घाट येथील सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी शितलताई महेश दाभाडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

गेवराई (प्रतिनिधी)

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित दादा गटाच्या वतीने मा.आ. अमरसिंह पंडित व आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मा. नगराध्यक्ष महेश अण्णा दाभाडे यांच्या पत्नी सौ. शितलताई महेश दाभाडे यांनी नगराध्यक्ष पदासाठी साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल केला. गेवराई नगरपरिषद ची निवडणूक अतिशय चुरशीची होणार असून प्रचाराला वेग आला आहे. नगराध्यक्ष पदासाठी भाजप व राष्ट्रवादीमध्ये काट्याची टक्कर होणार असून ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर होणार




असल्याचे बोलले जात आहे. विजयसिंह पंडित आमदार झाल्यानंतर त्यांनी गेवराई शहराकडे बारकाईने लक्ष देऊन ११ महिन्यात अतिशय वेगाने गेवराई शहरात विकासाची भरपूर कामे केली. या झालेल्या कामामुळे गेवराई शहराच्या वैभवात भर पडली आहे. तसेच नगरपरिषद ची निवडणुकी विकासाच्या मुद्द्यावर होणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून सर्वसाधारण घरातील सौ.शितल महेश दाभाडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दि. १३ गुरुवार रोजी अतिशय साध्या पद्धतीने दाखल केला त्यामुळे सर्वसामान्यांचा उमेदवार म्हणून त्यांची गेवराई शहरात प्रतिमा निर्माण झाली आहे. तसेच ही निवडणूक अतिशय चुरशीची होणार असून प्रस्थापितांना सर्वसाधारण घरातील उमेदवार टक्कर देणार आहे.

## जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत सी.व्ही.रमण व मेरी क्युरी जयंती साजरी

केज/प्रतिनिधी

दि.७ नोव्हेंबर २०२५ रोजी सी.व्ही.रमण व मादाम मेरी क्युरी यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून पुजन करून अभिवादन केले.चंद्रशेखर वेंकट रमण यांचा जन्म तामिळनाडू राज्यातील तिरुचिरापल्ली येथे झाला ते भारतीय भौतिक शास्त्रज्ञ होते.१९३० मध्ये प्रकाश विखुरण्यासाठी त्यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले असे आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळा केंद्र केज मुलांची ता.केज शाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ कदम यांनी सांगितले.भारत सरकार तर्फे दरवर्षी राष्ट्रीयविज्ञान दिन म्हणून हा दिवस ओळखला जातो.रमण हे१९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन



इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स मध्ये पहिले भारतीय संचालक बनले. मादाम मेरी क्युरी या पोलिश वंशाच्या फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ आणि रसायनशास्त्रज्ञ होत्या. त्यांचा जन्म दि.७ नोव्हेंबर १८६७ रोजी झाला.त्या रेडिओ अक्टिव्हिटीवरील (किरणोत्सर्गी)कामासाठी प्रसिद्ध आहेत.त्यांनी दोनदा नोबेल पारितोषिक जिंकले आणि फ्रान्समध्ये डॉक्टर ऑफ सायन्स पदवी मिळविणारीपहिली महिला होत्या.त्यांनी किरणोत्सर्गी संस्थानिकांचे पृथक्करण करण्यासाठी तंत्रांचा शोध लावला.भौतिक शास्त्रातील नोबेल पारितोषिक पती पियरे क्युरी आणि हेन्री बेकरेल यांच्यासोबत मिळाले. नोबेल पारितोषिक मिळविणारी पहिली महिला.दोन वेगवेगळ्या विज्ञान शाखांमध्ये नोबेल पारितोषिक मिळविणारी पहिली महिला.स्वता:, पती व मुलगा यांना पारितोषिक मिळाले अशी माहिती श्री.राजाभाऊ कदम यांनी दिली.या शाळेतील प्राथमिक पदवीधर शिक्षक डॉ.मुळे रामकिशन व संदीपठोंबरे, शिक्षक श्री.आकाश लोंढे, श्री.राहुल बचुटे, श्री.आबासाहेब धपाटे, शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली, ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी, शापोआ.कामगार सुवर्णमाला पवार यांनी सखोल माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री.राहुल बचुटे यांनी केले व आभार संदीप ठोंबरे सर यांनी मानले.

## धर्म नाही,माणुसकी महत्त्वाची,शिवरायांचा मुस्लिम मावळा समीर शेख गेल्या ८ वर्षापासून काशीहून आणतो गंगाजल

**आष्टी (प्रतिनिधी)**

**तू हिंदू बनेगा ना मुसलमान बनेगा इंसान की औलाद है, इंसान बनेगा या अमर ओळींना वास्तवात उतरवणारा एक तरुण आज आपल्या कार्याने सर्वधर्मीय ऐक्याचा दीप प्रज्वलित करतो आहे. आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथील समीर बादशहा शेख हे गेली आठ वर्षे काशीहून गंगाजल आणण्याची परंपरा जपत आहेत. धार्मिक सलोखा, मानवता आणि शिवभक्ती यांचे सुंदर मिश्रण असलेले त्यांचे कार्य आज पंचक्रोशीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.**

यंदाही ८ नोव्हेंबर रोजी समीर शेख यांनी गावातील २१ युवकांसह वाराणसीला प्रस्थान केले. गंगेच्या पवित्र तीरावरून गंगाजल भरून १२ नोव्हेंबर रोजी ते भैरवनाथ जन्माष्टमी सोहळ्यासाठी सांगवी पाटण गावात परतले. या यात्रेत संतोष भोसले, छगन भगत, गोविंद इरले, श्रीकृष्ण मरकडे, राघव खिलारे, महेश खिलारे, सुमित खिलारे, अमित गवारे, सागर



खिलारे, पोपट व अंबादास भोसले, धनंजय व गणपत भोसले, सचिन व सुनील बोराडे, अनिकेत गव्हाणे, राहुल खंडागळे, बाळू बोराडे, आदित्य सातपुते यांसह अनेक युवक सहभागी होते.

सर्वधर्मीय एकतेचा अनोखा संदेश

शिवरायांचे मुस्लिम मावळा म्हणून ओळखले जाणारे समीर शेख समाजकार्यात नेहमीच अग्रस्थानी आहेत. सर्व धर्मात सलोखा आणि एकोपा हेच त्यांचे ध्येय असल्याने ते दरवर्षी काशीस जाऊन गंगाजल आणतात व सांगवी पाटण येथील भैरवनाथ मंदिरात जलाभिषेक करतात. या सोहळ्यास पंचक्रोशीतील हजारो भाविक आवर्जून उपस्थित राहतात.

माणुसकी हीच खरी जात

आपण कोणत्या धर्मात जन्माला आलो हे आपल्याला ठरवता येत नाही. पण सर्व धर्माचा आदर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. देव एकच आहे आणि माणुसकी हाच खरा धर्म आहे, असे समीर शेख सांगतात. समीर गेली दहा वर्षे शिवनेरी ते सांगवी पाटण असा पायी प्रवास करून शिवज्योत घेऊन येतात. एम.एस.सी., बी. एड., एम. एड., जर्नालिझम या पदव्या प्राप्त केलेले ते सध्या आ. सुरेश (आण्णा) धस यांचे स्वीय सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. गोरगरीबांना मदत, पूरग्रस्तांची सेवा, अपघातग्रस्तांना तात्काळ धावून जाणे, श्रावणबाळ व निराधारांना आधार, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील योगदान अशा विविध माध्यमांतून त्यांनी मानवतेची खरी सेवा केली आहे. हरिनाम सप्ताहातही त्यांचा सक्रीय सहभाग असतो.

समीर शेख यांनी उभारलेली सर्वधर्मीय सलोख्याची परंपरा आज समाजात मानवतावादाची नवी रुजवात करीत आहे. त्यांच्या कार्यामुळे तू हिंदू बनेगाया गीतातील मानवतेचा संदेश फक्त शब्दांपुरता न राहता आचरणातूनही प्रभावीपणे उमटताना दिसत आहे.

## आष्टीत आज शिवतीर्थ येथे छत्रपती शिवाजी महाराज पुर्णाकृती पुतळा अनावरण

### गृहप्रवेश,पंचायत राज संवाद मेळाव्याचे आयोजन

**आष्टी (प्रतिनिधी)**

**सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांच्या आष्टी शहरातील शिवतीर्थ याठिकाणी गृहप्रवेश आणि हिंदवी स्वराज्य संस्थापक शौर्य पराक्रम आणि प्रजाहित दक्षतेचे प्रतीक असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णा कृती पुतळ्याचे अनावरण आणि मुख्यमंत्री पंचायतराज संवाद मेळावा** आयोजन आज शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर रोजी दु. १२.५ वा. यावेळी करण्यात आले आहे. याप्रसंगी महाराष्ट्र राज्याचे विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण सार्वजनिक बांधकाम मंत्री ना. शिवेंद्रराजे भोसले महाराज यांचे शुभहस्ते आणि मुख्यमंत्री पंचायत राज अभियानाचे संवाद मेळाव्याचे उद्घाटन ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आ.सुरेश धस हे भूषवणार आहेत. यावेळी पद्मश्री पोपट पवार, खा. बजरंग सोनवणे, निलेश लंके, खा. नितीन पाटील पुणे आणि पुणे येथील यशदाचे उपमहासंचालक मल्लिनाथ कलशेट्टी आदि मान्यवर देखील उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सरपंच परिषदेचे महाराष्ट्र राज्यातील पदाधिकारी आणि हजारो सरपंच उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी केले आहे.

# कवडगावातून पत्रकार अशोक निपटे यांना मिळू शकते उमेदवारी!

## गेल्या निवडणुकीत घ्यावी लागली होती माघार, यावेळी दादांची 'होकार' शिक्कामोर्तब?

वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील कवडगाव पंचायत समिती गण सर्वसाधारणसाठी खुला असून या गणातून लोकप्रिय नेते, आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे विश्वासू सहकारी आणि पिंपरखेडचे विद्यमान उपसरपंच तसेच ख्यातनाम पत्रकार अशोक निपटे यांना उमेदवारी मिळणार असल्याची चर्चा सध्या जोरात रंगली आहे. गेल्या निवडणुकीत निपटे यांना ऐनवेळी माघार घ्यावी लागली होती. त्यामुळे या वेळी दादांची मान्यता मिळणार का? या प्रश्नाने संपूर्ण गणात उत्सुकता पसरली आहे. सन २०१२ साली निपटे यांनी पहिल्यांदा उमेदवारी मागितली होती. त्यावेळी स्थानिक नागरिक आणि पत्रकारांनी मोठ्या प्रमाणात त्यांच्याबाबत जनआंदोलन केले होते. आमदार प्रकाशदादा सोळंके यांनाही पत्रकारांनी भेट घेऊन उमेदवारी देण्याची विनंती केली होती. त्यावेळी उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात होती, पण शेवटच्या क्षणी निर्णय बदलला गेला - आणि पक्षालाही त्याचा फटका



बसला.

यानंतर अशोक निपटे यांनी निराश न होता गावाच्या विकासाची वाट पकडली. सरपंच म्हणून आणि आता उपसरपंच म्हणून त्यांनी पिंपरखेडचा कायापालट केला. आमदार प्रकाशदादा सोळंके, धैर्यशील काका सोळंके आणि युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केले.

कवडगाव पंचायत समिती गणातील कवडगाव, मोरेवाडी, देवडी, खळवट, लिमगाव, काडीवडगाव, चिंचवडगाव, खापरवाडी आणि पिंपरखेड या गावांमध्ये निपटे यांचे नाव लोकांच्या मनात ठळकपणे आहे. त्यांच्या पत्रकारितेतील अनुभवामुळे प्रशासनात चांगली वचक असून, पंचवीस वर्षांच्या सातत्यपूर्ण समाजसेवेचा ठसा त्यांच्या कार्यावर उमटलेला आहे.

मागील वेळेसची संधी हुकल्याने यावेळी मात्र अशोक निपटे यांनाच उमेदवारी मिळावी अशी जोरदार मागणी शेतकरी व सामान्य नागरिकांतून होत आहे. या जनभावनेचा विचार करून आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्याकडून निपटे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता प्रबळ असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

या संदर्भात अशोक निपटे यांनी प्रतिक्रिया देताना सांगितले -

प्रकाशदादा सोळंके यांचे नेतृत्व आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. दादा आणि जयसिंग भैय्या जो निर्णय घेतील तोच आमच्यासाठी अंतिम असेल. उमेदवारी मिळाल्यास आम्ही शंभर टक्के विजयी होऊन दादांच्या आणि भैय्यांच्या नेतृत्वाखाली या भागाचा कायापालट करू, अशी ठाम भूमिका निपटे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केली.

# धारूर घाटात ट्रक दरीत कोसळला, चालक-क्लीनर थोडक्यात बचावले

प्रतिनिधी । धारूर

धारूर तालुक्यातील घाट परिसरात बुधवारी सायंकाळी भीषण अपघाताची घटना घडली. अंबाजोगाई येथून संभाजीनगरकडे विटांची वाहतूक करणारा १२ टायर ट्रक (क्रमांक के ५६७२९२) धारूर घाटातून जात असताना धोकादायक वळणावर अपघात झाला. सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास समोर उभ्या असलेल्या ट्रॅक्टरला चुकवताना चालकाचा ट्रकवरील ताबा सुटला आणि घाटातील कठडे तुटून ट्रक थेट सुमारे ३०० फूट खोल दरीत कोसळला.

या अपघातात चालक अजय लक्ष्मण आणि कीनर स्टीवन यांचा थोडक्यात जीव वाचला आहे. ट्रक दरीत कोसळताच चालकाने प्रसंगावधान राखत उडी घेतली होती. दोघेही किरकोळ जखमी झाले असून स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. अंधार असल्याने नागरिकांनी



मोबाईलच्या प्रकाशाच्या मदतीने दरीत उतरून चालक आणि क्लीनरला वर काढले. त्यानंतर दोघांनाही धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होत .

अपघात एवढा भीषण होता की ट्रकचा पूर्णपणे चक्काचूर झाला आहे. दरीत कोसळताना ट्रकमधील विटा सर्वत्र विखुरल्या गेल्या असून मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती. प्रशासनाकडे या ठिकाणी संरक्षणात्मक उपाययोजना आणि मजबूत कठडे उभारण्याची मागणी केली आहे. या ठिकाणी मालवाहू ट्रक दरीत कोसळण्याचे प्रकार सतत घडत आहे



केज/प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर द्वारा आयोजित जिल्हा स्तरीय थलेटिक्स स्पर्धेमध्ये बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाची बी.एस्सी.तृतीय वर्षात शिकणारी विद्यार्थिनी कु. दहिभाते अश्विनी महादेव हिचा प्रथम क्रमांक आला असुन तिची सेंट्रल झोन साठी निवड झाली आहे. अश्विनी दहीभाते च्या या यशाबद्दल संस्थेचे सचिव रमेशराव आडसकर,डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजी नगर च्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या अर्चनाताई आडसकर,प्राचार्य डॉ. माधवराव फावडे, अधिक्षकपी.एस.भोसले,डी.एस.यादव यांनी अभिनंदन केले आहे.बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाच्या वतीने अश्विनी दहीभाते व तिचे पालक यांचा सत्कार प्राचार्य डॉ.माधवराव फावडे यांनी केला.या प्रसंगी डी.एस.यादव, डॉ.सचिन शिंदे,डॉ.सौ. रतन गंगणेडॉ.अनिल गायकवाड,डॉ.काळम, डॉ.सरसरे व महाविद्यालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी चे थकित मानधन तात्काळ द्या - प्रा.बबनराव आंधळे

बीड/प्रतिनिधी

मुख्यमंत्री युवा कार्य शिक्षण योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या बेरोजगार युवा प्रशिक्षणार्थींना त्यांच्या थकीत मानधनाच्या समस्येवर तोडगा काढण्याची मागणी केली आहे विशेष म्हणजे पहिल्या टप्प्यातील जानेवारी,फेब्रुवारी महिन्याचे मानधन एक वर्ष उलटूनही मिळालेले नाही.दुसऱ्या टप्प्यातील मानधन थकीत आहे त्यामुळे प्रशिक्षणार्थी मध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शिक्षणाधिकारी बीड यांना ग्रामीण युवक संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने निवेदन देण्यात येणार आहे. प्रशासनाच्या या उदासीन धोरणामुळे सुशिक्षित



बेरोजगारीच्या श्रम आणि वेळेचा अपमान होत असल्याची भावना प्रशिक्षणार्थ्यांनी व्यक्त केली आहे. प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रमुख समस्या आणि मागण्या आहेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या पहिल्या टप्प्यातील जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्याचे मानधन एक वर्ष उलटूनही मिळालेले नाही.जुलै मध्ये ऑर्डर मिळूनही जुलै,ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर या चार महिन्याचे मानधन अद्याप मिळालेले नाही. नोव्हेंबर महिना सुरू झाला असून दसरा होऊन गेला आणि दिवाळी अंधारात गेली सणासुदीत मानधन न मिळाल्याने कुटुंबाच्या आर्थिक गरजा पूर्ण करताना प्रशिक्षणार्थींना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागला या निवेदनात प्रशिक्षणार्थींने प्रशासनाच्या उदासीनते वर कठोर टीका केली आहे.बेरोजगार तरुणांना त्यांच्या मानधना साठी प्रशासनाच्या दारात यावे लागते ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.प्रशिक्षणार्थींने पुढील तीन स्पष्ट मागण्या केल्या आहेत जानेवारी, फेब्रुवारी या मागील थकीत महिन्याचे मानधन त्वरित अदा करावे जुलै ते ऑक्टोबर या महिन्याचे थकित मानधन येत्या आठ दिवसाच्या आत अदा करावे भविष्यात प्रशिक्षणार्थींचे मानधन दर महिन्याच्या पाच तारखे पर्यंत नियमितपणे जमा होईल यासाठी ठोसयंत्रणा तयार करावी प्रशासनाने बेरोजगार तरुणांची कुचेष्टा थांबवावी अन्यथा ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा.बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# ऐ.डी.फाउंडेशनचा महाराष्ट्र नारिशक्ती समाजरत्न पुरस्कार २०२५ अनिता ठाकूर यांना जाहीर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अनुश्री धनश्री फाउंडेशन सांगली, यांच्या वतीने दरवर्षी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो.अनिता ठाकूर या स्वातंत्र्य सेनानी संग्रामसिंग चौहान यांच्या नातं व वामनराव ठाकूर यांच्या स्नुषा आहेत. त्यांना माहेरी, सासरी या दोन्हीकडे समाज कार्याचे बाळकडू मिळाले. त्यांनी ज्ञानप्रबोधिनी येथे प्रसाद चिक्षे,अभिजित जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालवाडी शिक्षिका म्हणून काम केले. त्या नंतर विमल मुंदडा यांच्या पारिवारिक संबंध तात आल्या त्या कालावधीत त्यांनी तहसिल अंतर्गत दक्षता समिती,स्वा.रा.ती. रुग्णालय अभ्यागत मंडळ,भ्रष्टाचार समिती अशा अनेक शासकीय, निमशासकीय समितीवर कार्य केले. तसेच स्वातंत्र्य सैनिक वसाहतीमध्ये विविध महिलांना एकत्र करून बचत गटाची स्थापना केली व त्या माध्यमातून महिलांना स्वबळावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.आधारकार्ड, मतदानकार्ड,आयुष्मान भारत कार्ड इ.तात्काळ उपलब्ध होण्यासाठी अधिकारी,कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून ते उपलब्ध करून दिले. वसाहतीतील रहिवासी यांचे वाढदिवस अनाथाश्रम, अंधमूकबधिर शाळा आदी ठिकाणी साजरे करतात व ते साजरे करताना कपडे,खाऊ याचे वाटप केले जाते.छोटच्या गोष्टीतून माणसं जोडणे,अडीअडचणी सोडवणे हा अनिता ताईंचा स्वभाव आहे.त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. एका गृहिणीला, सर्वसामान्य स्त्री चा खऱ्या अर्थाने सन्मान होत असल्याने अनिता ठाकुर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



# बस स्थानकात चोरी करणारा जेरबंद

परळी / प्रतिनिधी

नांदेडहून बीड येथे जात असताना परळी बस स्टॅन्ड येथे बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेऊन अनोळखी आरोपीने गळ्यातील १३ ग्रॅम वजनाचे १,४५,०००/ रुपयाचे मिनी गंठण चोरून नेल्याप्रकरणी परळी येथील संभाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून वरीष्ठांनी तपास अधिकारी यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या. त्यावरून तपासीक अंमलदार पोह/४१६ साजीद पठाण यांनी गुन्हयाचे तपासात बस स्थानक परळी येथील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज पाहून आरोपी निष्पन्न केले. आरोपी ऑटो मधून गेल्याचे दिसून आले. सदर मार्गावरील परळी शहरातील सीसीटीव्ही फुटेज चेक करून त्यांचा मार्ग शोधला असता शहराच्या बाहेर दोन किलोमीटर गेले व तेथे थांबून असलेल्या चार चाकी स्विफ्ट डिजायर गाडी मधून निघून गेले. गाडीचा नंबर व तांत्रिक पुराव्याच्या आधारे शोध घेतला असता सदरचा गुन्हा १. नरसिंग कोंडीबा बंन वय ३८ वर्ष रा. गांधीनगर, उदगीर ता. उदगीर जि. लातूर व त्याच्या दोन महिला साथीदारासह केला असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर गुन्ह्यात आरोपी नामे नरसिंग कोंडीबा बंन वय ३८ वर्ष रा. गांधीनगर, उदगीर ता. उदगीर जि. लातूर यास अटक करून त्याच्याकडून गुन्ह्यात चोरीस गेलेले १,४५,०००/- किंमतीचे सोन्याचे १३ ग्रॅम वजनाचे मिनीगंठण व आरोपीने गुन्हा करताना वापरलेली स्विफ्ट डिझायर चार चाकी गाडी क्रमांक चक-०४-गइ-१५६० किंमत अंदाजे ५,००,०००/ -असा एकूण सदर गुन्ह्यात ६,४५,०००/-रुपये चा मुद्देमाल जप्त केला आहे.

# मराठवाड्यातील गोड्या पाण्यातील स्थानिक व पारंपारिक मच्छिमारांचे अनुदान वाटप करा

प्रदेशमंत्री अंकुश बलया - भारतीय मच्छुवारा संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

माजलगाव (प्रतिनिधी)

मराठवाड्यातील गोड्या पाण्यातील स्थानिक व पारंपारिक मच्छीमारांना शासन स्तरावरून शंभर कोटी रूपयांचे अनुदान मंजुर असुन ते अनुदान हे मच्छीमारांना मिळालेले नसुन प्रशासनाकडुन जाणिवपुर्वक मच्छिमारांना वंचित ठेवले जात असल्याचा आरोप करत मच्छिमारांचे सरसकट सर्व्हे करून शासनस्तरावरून अनुदान वाटप करावे अशी मागणीउ भारतीय मच्छुवारा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशमंत्री अंकुश बलया यांनी सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय बीड व जिल्हाधिकारी यांचेमार्फत थेट मुख्यमंत्र्यांकडे निवेदनाव्दारे मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मराठवाड्याती मच्छीमारी सहकारी संस्थेमध्ये वीस टक्के मच्छीमार सभासद असून बिना सभासदांना अद्यापपर्यंत अनेक प्रकारच्या शासकीय योजनेपासुन ८० टक्के मच्छीमार सभासद नसल्यामुळे वंचित रहावे लागत आहे तर काही ठिकाणी मच्छीमारी सहकारी संस्था बरखास्त झाल्या आणि काही संस्था उपलब्ध नाहीत. त्यामध्ये पैठण येथील नाथसागर, माजलगाव, दुधना वाकडी, उजणी, भंडारा, पूर्णा हे धरण तसेच घोड नदी, नाशिक ते नांदेड पर्यंत गोदावरी, भिमा, सिंदफणा, चंद्रभागा नदीच्या किनारीचे स्थानिक व पारंपारिक मच्छीमार शासनाच्या योजनांपासुन वंचित राहत आहेत. त्यामुळे लाडकी बहिण योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील कहार, भिल्ल, भोई, परदेशी, केवट, मल्वभोई, ढीपर, कश्यप या मच्छिमारांचे



शासनस्तरावरून सर्व्हे करा मच्छिमारांचे सरसकट कर्ज माफ करा, अतिवृष्टीने जाळे, पिंजरे, पिळणे, गळ, होडी, चपु यासह विवीध साहित्याचे झालेले नुकसान तात्काळ द्या, स्थानिक काहार, भोई, भिल्ल मच्छीमारांच्या मुलांचे शालेय साहित्य पाण्यात भिजुन नुकसान झालेले आहे. या नुकसान भरपाई पोटी शासनाने शंभर कोटी रूपयांचा मंजुर केलेल निधी मच्छिमारांचे सरसकट सर्व्हे करून त्यांना वाटप करण्यात यावा अशी मागणी निवेदनाव्दारे मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली आहे. निवेदनावर भारतीय मच्छुवारा संघटनेचे महाराष्ट्र प्रदेशमंत्री अंकुश बलया, लहु बलया, गणेश बलया, उमेश बलया, कचरू परसे, कमल परसे, शेषेकला बलया, सिता बलया, शारदा बलया, नामदेव घुंगासे, मच्छींद्र घुंगासे, गोरख घुंगासे यांचेसह मच्छिमारांच्या स्वाक्ष-या आहेत.

# शितलताई दाभाडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादीच्या महिला रणरागिणींची आघाडी

गेवराई (प्रतिनिधी)

सध्या गेवराई शहरांमध्ये नगर परिषद निवडणूकीचा प्रचार चांगलाच रंगात आलेला आहे. नगराध्यक्ष पदासाठी सौ. शितल महेश दाभाडे यांनी प्रचारात चांगलीच आघाडी घेतली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या महिला आघाडीच्या महिला रणरागिणी यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण शहरभर प्रचार रॅली काढून मतदारांशी संपर्क करत आहेत. या रॅलीला प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.

यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी च्या महिला आघाडीच्या विधानसभा क्षेत्राध्यक्ष सौ. मुक्ताताई आर्दड (मोटे) म्हणाल्या कि, १० वर्ष आमदार असताना लोकांची अवहेलना करणारे व लोकांनाच माझी गरज आहे असे म्हणणारे आता परत दारोदार जाऊन मतांचा जोगवा मागायला लागले आहेत. कारण त्यांना त्यांचा पराभव



दिसू लागला आहे. मतदार राजा मात्र सर्व लक्षात ठेऊन योग्य वेळेला उत्तर देत असतो. याचा प्रत्यय विरोधकांना येत आहे. मतदारांनी कित्येक ठिकाणी त्यांच्यावर प्रश्नांचा भडीमार करुन निरुत्तर केले आहे. मतदार राजाला सर्व समजते त्यामुळे येणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीत माजी आमदार अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली नगराध्यक्ष पदासहीत सर्व नगरसेवक निवडून देऊन शहराच्या विकासाची संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडीच्या पल्लवी गोगुले, योगिता तांबारे, किरण दाभाडे, शिला पैठणे, अनिता काळे, निता बेद्रे, संगीता घोडके, प्रिती दाभाडे, सीमा होंडे, सीमा जवंजाळ, प्रणिता रूकर यांच्या सह शेकडो महिला सहभागी आहेत.

# ग्रामीण पोलीसांनी अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्या १९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल,एक कोटी चाळीस हजार चा मुद्देमाल जप्त

अनिल धमने पाटील
नांदेड जिल्हा प्रतिनिधी

नांदेड : - वाळु माफियांवर नांदेड ग्रामीण पोलीसांची मोठी कारवाई ड्रोन च्या सहाय्याने पळालेले आरोपी व लपवुन ठेवलेले इंजीन ताब्यात घेवून सुमारे १, कोटी ००, ३९, ४००/- रुपयाचा मुद्देमाल केला जप्त केला असुन जवळपास नऊ बिहारी कामगारासह दहा मालका विरुद्ध पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण येथे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे दाखल केले असून या केलेल्या कार्यवाही मुळे खळबळ उडाली असून जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या सह वरीष्ठ अधिकारी यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. या प्रकरणी पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार,फिर्यादी पोहेकों वसंत केंद्रे, पो.स्टे. नांदेड ग्रामीणगुरनं १०७८/ २०२५ कलम ३०३( २), ३( ५) भा.न्या.सं. सहकलम ४८( ७), ४८( ८) महाराष्ट्र जमीन महसुल माहिती अधिनियम दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी वेळ ५.ते १२ वाजता च्या दरम्यान काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कड, पिंपळगाव भणगी वाहेगाव, गंगाबेट, कल्लाळ गोदावरी नदीपात्रात व किनाऱ्यावर अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक, नांदेड,श्रीमती अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक, भोकर,सुरज गुरव अप्पर पोलीस अधीक्षक, नांदेड प्रशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी उप विभाग इतवारा नांदेड, यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हा उघडकीस आणणारे पोलीस अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर,सहाय्यक पोलीस निरीक्षक व्यंकट कुसमे, उपनिरीक्षक ज्ञानेश्वर मठवाड पोहेकॉ केंद्रे, पोहेकॉ अर्जुन मुंडे, पोकॉ मारोती पचलींग, पोकॉ पवार,पोकॉ कल्याणकर, पोकॉ लव्हारे, पोकॉ पैनापल्ले, पोकॉ चावरे, पोकॉ भिसे, पोकॉ समीर, पोकॉ शेख जमीर, पोकॉ शेख आसीफ, पोकॉ धम्मपाल कांबळे, सर्व नेमणुक पो.स्टे. नांदेड ग्रामीण यांनी अवैध रित्या उत्खनन करणारे आरोपी, गणेश लखन जाधव वय ५० रा. सिन्हा ता. वाढार जिल्हा आरा बिहार,बिलास परमेश्वर सहानी वय ५० वर्ष रा. श्रीपुर डेरा ता. टकरसुन जिनहा बलिया उत्तरप्रदेश मुन्ना बिरवाहथुर चौधरी वय ४१ वर्ष रा. दामोधरपुर ठाणा सहापुर जिल्हा भोजपुर बिहार,सरोज छोटेलाल चौधरी वय ३० रा. दुल्हापुर ता. शेवराई जिल्हा गाजीपुर उत्तरप्रदेश ,शिवकुमार जमना बिंद वय ३५ वर्ष रा. जपतुर ता. जि. गाजीपुर उत्तरप्रदेश,विजय शंकर सहानी वय ३० वर्ष रा.धोगमा ता. पुसा जि. समस्तपुर बिहार वकील मिश्री सहानी वय ४८ वर्ष रा.जात ता. गायघाट जिल्हा मुझ्यापुर बिहार सजिवन घुरुल विन वय ४१ वर्ष रा. चकी जि. बक्सर बिहार ९) छोटक हरेराम बिन वय ३२ वर्ष रा. चकी जि. बक्सर बिहार, अर्जुन विलासराव श्रीरसागर वय ३० वर्ष रा. बोरगाव तेलंग तालुका जिल्हा नांदेड (मालक) शंकर आंबादासराव पवार वय ३२ वर्ष रा. कोरका ता.जि. नांदेड (मालक) राजकुमार सोनटक्के रा. गंगावेट (मालक)नारायण पुंड रा. पिंपळगाव (मालक)पपन क्षिरसागर रा. कल्लाळ (मालक) रामदास क्षिरसागर रा. कल्लाळ (मालक) शिवाजी हंबर्डे रा. विष्णुपुरी (मालक) पुंडलीक सोनटक्के रा. वाहेगाव (मालक) कैलाश क्षिरसागर (मालक) बालाजी हंबर्डे रा. विष्णुपुरी (मालक) जप्त मुद्देमाल/ एकूण मुद्देमाल यात ७ इंजिन किं.अं. २१, ००, ०००/-, १०९ तराफे किं. अं. ५४, ५०,०००/- रुपये ३ बोटी किं. अं. २१, ००, ०००/- , ३२ लोखंडी ड्रम किं.अं. ३२, ०००/- रुपये १९ प्लास्टीकचे ड्रम किं. अं. ११, ४००/- रुपये , ३९ लोखंडी पाईप किं, अं. १, १७, ०००/- रुपये , ४५ ब्रास रेती किं.अं. २, २५, ०००/- , ११ टोपले किं. अं. २, २००/- रुपये , ६ खोरे किं. अं. १८००/- रुपये असा एकुण १, ००, ३९, ४००/- (अक्षरी एक कोटी एकोणच्याळीस हजार चारशे) रुपयाचा मुद्देमाल जप्त केला त्यापेकी काही जाळुन बुडवून नष्ट करुन बाकी ताब्यात घेतला आहे.

अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी ऑपरेशन फ्लश आऊट अंतर्गत अवैधरित्या गौण खनिज (रेती) उपसा व वाहतुक करणारे लोकांवर कारवाई करणे बाबत सर्व पोस्टे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत केले आहे. गोदावरी नदीपात्रात चोरुन लपुन अवैध रेती उपसा होत आहे अशा माहीतीवरुन योग्य तो सापळा लावुन सकाळी ४ वा. वरील सर्व अधीकारी व अंमलदार हे बोट, डीझेल, पेट्रोल, ड्रोन व इतर आवश्यक साहीत्यासह गोदावरी नदीपात्रात कल्लाळ या ठीकाणावरुन उतरले व बोटीच्या साहाय्याने काळेश्वर, विष्णुपुरी, मार्कड, पिंपळगाव, भंगी वाहेगाव, गंगाबेट, कल्लाळ या ठीकाणी जाऊन



छापा कारवाई केली. सदर ठिकाणी गोदावरी नदी पात्रातुन इंजीन, बोट, तराफे खोरे, फावडे मजुराच्या सहाय्याने रेती चोरी करत होते. त्या ठिकाणी जावुन वरील प्रमाणे मुद्देमाल बाहेर काढने शक्य नव्हता तो जाळून बुडवून नष्ट केला.

काही आरोपी पोलीसांना पाहुन पळून जाऊन शेतात लपले होते त्यांना ड्रोन चा वापर करुन पकडुन ताव्यात घेतले तर काही इंजीन लपवुन ठेवले होते ते ड्रोनच्या साहाय्याने शोधुन जप्त केले. असा एकुण १, ००, ३९, ४००/- मुद्देमाल जप्त करुन कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील नमुद आरोपीतांपैकी ९ बिहारी मजुर व १० मुख्य मालक यांचे विरोधात गुन्हा दाखल केला असुन १० जन ताव्यात आहेत. सदर आरोपीतांविरोधात कलम ३०३( २), ३( ५) भा. न्या.सं. सहकलम ४८ ( ७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.केले आहे,वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेल्या कामगीरीचे अबिनाश कुमार, पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे

## श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्थेत वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी

## परीक्षेचा ताण व्यवस्थापन आणि वसतिगृह स्वच्छता या विषयावर मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पुष्पा गायकवाड यांचे मार्गदर्शन

नांदेड ।अनिल धमने पाटील

संस्थेत नजीकच्या काळात परीक्षा सुरु होत आहेत. परीक्षेच्या काळात बरेच विद्यार्थी परीक्षेचा ताण घेत असतात याचा विचार करून संचालक डॉ. मनेश कोकरे यांचे मार्गदर्शनाखाली रेक्टर डॉ.सावरकर सर व वसतीगृह वार्डन यांनी एस.जी.जी.एस. संस्थेतील देवगिरी, नंदगिरी आणि गोदावरी वसतिगृहातील निवासी विद्यार्थिनींसाठी ८ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:३० वाजता कृष्णा मेस रिक्रिएशन हॉलमध्ये एक दिवसीय, मार्गदर्शन वर्ग/ चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या मार्गदर्शन वर्गात/चर्चासत्रात



दोन महत्त्वाच्या विषयांवर विद्यार्थीनीना मार्गदर्शन करण्यात आले, ज्यात परीक्षेचा ताण व्यवस्थापन आणि वसतिगृह स्वच्छता या विषयांचा समावेश होता.

मानसोपचारतज्ज्ञ डॉ. पुष्पा गायकवाड यांनी विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थीनीना परीक्षेच्या तणावाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि परीक्षेच्या काळात सकारात्मक मानसिक दृष्टिकोन राखण्यासाठी प्रभावी तंत्रांवर मार्गदर्शन केले. त्यांनी चांगल्या आरोग्यासाठी आणि राहणीमानासाठी वसतिगृह परिसरात स्वच्छता आणि स्वच्छतेचे महत्त्व देखील अधोरेखित केले. या सत्राला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला आणि संवादात्मक चर्चेने त्याचा समारोप झाला. विद्यार्थ्यांमध्ये मानसिक आरोग्य आणि जबाबदार वसतिगृह जीवन या दोन्ही गोष्टींना प्रोत्साहन देने हा या उपक्रमाचा उद्देश होता.संचालक डॉ. मनेश कोकरे यांचे मार्गदर्शनाखाली रेक्टर डॉ.सावरकर, डॉ. प्रणिता बालवे व डॉ.पौर्णिमा तळेले यांनी डॉ.पुष्पा गायकवाड यांचे आभार मानून परीसंवादाचा समारोप केला .सदरील परीसंवाद यशस्वीपणे पार पाडण्यासाठी, वसतिगृहाचे रेक्टर डॉ.सावरकर सर यांचेसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांनी सहकार्य केले.

## नांदेड तहसीलच्या पथकाची पुन्हा वाळू माफियावर जबर कारवाई

नांदेड - नांदेड तहसीलदार यांच्या पथकाने गस्ती वर असताना नांदेड तालुक्यातील वाहेगाव गोदावरी नदीच्या पात्रात १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ५ वाजता अवैध रित्या वाळू उत्खनन करणारे ४ इंजिन व २० तराफे जिलेटीनचा सहायाने नष्ट करण्यात आले असून जवळपास २४ लाखांचा माल जागेवरच नष्ट करण्यात आला असून या कार्यवाही मुळे अवैध रित्या वाळू उपसा करणाऱ्यात खळबळ उडाली आहे.नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या व उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार संजय वारकड,नायब तहसीलदार संजय नागमवाड,सुनील माचेवाड ,मंडळ अधिकारी मोहसीन सय्यद ,कुणाल जगताप अनिरुद्ध जोंधळे ग्राम महसूल अधिकारी मनोज जाधव,बरोडा ,श्रीरामे



,जमदाडे, मनोज सरपे,महेश जोशी,गिरी, मुंगल, जमदाडे,सकवान,महसूल सेवक बालाजी सोनटक्के महसूल पथक वाहेगाव परिसरामध्ये पहाटे ५ वाजता अवैध रेती उत्खनन प्रतिबंधासाठी गस्तीवर असताना रेती उत्खनन करणारे ४ इंजिन आढळून आले. पथकाने मजुरांच्या साह्याने ४ इंजिन जिलेटीने स्फोट करून नष्ट केले. २० तराफे जाळून नष्ट करण्यात आले,असे एकूण जवळपास २४ लाख किमतीचा मुद्देमाल जाग्यावरच स्फोट करून व तराफे जाळून नष्ट करण्यात आले . बेकायदेशीर वाळू वाहतूक केल्यास याही पेक्षा कडक कारवाई करून संबंधितावर गुन्हा दाखल करून वेळप्रसंगी एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात येईल असा इशारा नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी दिला आहे.

## मनपा सिडको मालमत्ता धारकांशी २१ नोव्हेंबर रोजी एक दिवसासाठी

## मालमत्ता व पाणी पट्टी थकबाकी करावर ८० टक्के सुट

नवीन नांदेड -नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत २१ नोव्हेंबर रोजी एक दिवसासाठी मालमत्ता कर व पाणीपट्टी करात ८० टक्के सुट देण्यात येणार असुन मालमत्ता धारकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन क्षेत्रीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग व कार्यालय अधीक्षक विलास गजभारे यांनी केले आहे.

मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे व अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम यांच्या आदेशानुसार मालमत्ता उपायुक्त




अजितपाल सिंग संधू यांच्या आदेशानुसार मालमत्ता थकबाकीदार व पाणी पट्टी थकबाकी दार यांना २१ नोव्हेंबर रोजी एक दिवसासाठी मालमत्ता व पाणी पट्टी थकबाकी धारक यांना ८० टक्के सुट देण्यात येणार आहे.

झोन क्रमांक ६ सिडको अंतर्गत मालमत्ता व पाणीपट्टीचा थक बाकी वरील शास्तीमधे सुट्ट मिळण्यासाठी जाहीरातीसाठी लावण्यात आलेल्या यंत्रणा वेगवेगळ्या परिसरातील मालमता धारकांनी माहिती होण्यासाठी तिनं चाकी रिक्षा व्दारे माहितीसाठी दोन्ही प्रभागात यंत्रणा सज्ज केली असून कार्यालय अधीक्षक विलास गजभारे, वरीष्ठ लिपीक मिना अडबलवार,मोहन लांडगे,कर निरीक्षक शेख शादुला, संजय नागापूरकर,मारोती सारंग, वसुली लिपीक मालु एनफळे,पाईकराव प्रकाश दर्शने, रमेश यशवंतकर ,दिपक जोंधळे,ऊतम जौधंळे,मदन बैस ,कोल्हे नथुराम चवरे ,रविंद्र पवळे,नरेंद्र शिंगे,वसुली लिपीक हे मालमत्ता धारकाशी संपर्कात आहेत.

## भोकर पोलीस स्टेशन ऑपरेशन बीट कनेक्ट मोहीम अंतर्गत गावागावात भेट व बैठका

भोकर ।प्रतिनिधी

भोकर ,पोलीस स्टेशन भोकर हद्दीत आम्ही अजित कुंभार पोलीस निरीक्षक व आमचे अधिनस्त पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी दिनांक ७ नोव्हेंबर ते आज पावेतो प्रॉपर भोकर शहरातील १) प्रभाग क्रमांक ३ मधील शेख फरीद नगर २) प्रभाग क्रमांक ९ मधील व्यंकटेश टॉकीज परिसर चिखलवाडी ३) प्रभाग ११ मधील बिलाल नगर ४) चिखलवाडी कॉर्नर, ५) अहमदनगर, ६) बिलाल नगर ७) कोळगली ८) गांधीनगर ९) गांधी चौक १०) तेली गल्ली ११) हिंद नगर १२) व्यंकटेश टॉकीज मागील भाग १३) बालाजी मंदिर १४) मुधोळ गल्ली १५) इनामदार गल्ली व तसेच ग्रामीण भागातील



१) मौजे मोघाळी २) मौजे सायाळ ३) मौजे डौर ४) मौजे रायखोड ५) बोरगाव ६) धावरी (बुद्रुक) ७) बटाळा ८) पोमनाळा ९) जांभळी १०) थेरबन ११) रिट्ठा १२) चिदगीरी १३) खरबी १४) भोसी १५) सोमठाणा १६) कोळगाव १७) शिंगारवाडी १८) रेनापुर या सर्व भागात ६ ते ९ ३० वाजताच्या दरम्यान ऑपरेशन बीट कनेक्ट या मोहिमे अंतर्गत गावामध्ये भेट देऊन बैठका घेऊन सदर भागातील सर्व प्रमुख ज्येष्ठ नागरिक, मोहल्ला कमिटीचे सदस्य, सर्व जाती-धर्माचे व समाजाचे कार्यकर्ते तसेच नवतरुण यांच्या सोबत कॉर्नर बैठक घेऊन त्यांना नगरपरिषद निवडणूक तसेच आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने, आचारसंहिता नियम अवगत करून त्यांचे काटेकोरपणे पालन करणे बाबत तसेच सोशल मीडियाचे जबाबदारीने वापर करून कोणत्याही आक्षेपार्ह पोस्ट, वक्तव्य, रिल्स व्हिडिओ लाईक शेअर व फॉरवर्ड न करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच सायबर अवेअरनेस अनुषंगाने सूचना दिल्या असून मीटिंग करिता असणारे लोकांच्या समस्या ऐकून घेतलेल्या आहेत. तसेच यापुढेही सर्व गावांमध्ये भेटी देऊन मीटिंग घेण्यात येणार आहेत.

## शिवसेनेकडून निवडणूक प्रभारींची नियुक्ती

मुंबई : प्रतिनिधी

राज्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने गुरुवारी निवडणूक प्रभारींची यादी जाहीर केली. जिल्हानिहाय नेमण्यात आलेल्या या प्रभारींमध्ये पक्षाचे मंत्री, आमदार आणि पदाधिकारी यांचा समावेश आहे.

नाशिक जिल्ह्यातील नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत प्रभारी म्हणून आमदार सुहास कांदे, माजी खासदार हेमंत गोडसे, किशोर दराडे, धनराज महाले यांची नेमणूक करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आमदार विठ्ठल लंघे पाटील, अमोल खताळ आणि माजी खासदार सदाशिव लोखंडे यांची प्रभारी म्हणून नियुक्ती झाली आहे. नंदुरबार जिल्ह्याची जबाबदारी आमदार आमशा पाडवी, चंद्रकांत रघुवंशी, माजी आमदार शिरीष



चौधरी तर धुळे जिल्ह्याची जबाबदारी आमदार मंजुळा गावित यांच्यावर सोपवली आहे.जळगाव जिल्ह्यासाठी मंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत सोनवणे, अमोल पाटील,चंद्रकांत पाटील आणि माजी आमदार शिरीष चौधरी निवडणूक प्रभारी असतील. नागपूर जिल्ह्यासाठी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, माजी मंत्री दीपक सावंत आणि माजी खासदार कृपाल तुमाने यांची प्रभारी म्हणून नियुक्ती झाली आहे. तर पुणे जिल्ह्यासाठी खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे आणि शरद सोनवणे यांना निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

## खरडून गेल्याचा अहवाल प्राप्त झाला

नांदेड :- जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांची तालुकास्तरीय समित्यांमार्फत झालेल्या पडताळणीनुसार एकूण १७ हजार १२४ शेतकऱ्यांचे सुमारे ४ हजार ६१९ हेक्टर क्षेत्र खरडून गेल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. या पात्र शेतकऱ्यांनी संबंधित गटविकास अधिकाऱ्यांच्या मार्फत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) या शेतजमिनी सुधारणा कामांसाठी प्रति हेक्टर कमाल तीन लाख रुपयांपर्यंत निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, १३ ऑक्टोबर रोजीच्या शासन निर्णयानुसार अतिवृष्टीमुळे खचलेल्या वा बुजलेल्या सिंचन विहिरींच्या दुरुस्तीकरिता पात्र शेतकऱ्यांना विहिरीसाठी ३० हजार रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यापैकी १५ हजार रुपये आगाऊ स्वरूपात देण्यात येतील, तर उर्वरित १५ हजार काम पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येतील.

तरी पात्र शेतकऱ्यांनी आपल्या अर्जांची पूर्तता करून तालुका पंचायत समितीकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले व मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी केले आहे. अशी माहिती नरेगाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड यांनी दिली आहे.

## बरबडा येथे नवीन राष्ट्रीयकृत बँक शाखेची जिल्ह्यातील तिनीही

## खासदार यांच्या कडे शेतकरी व व्यापाऱ्यांनी केली मागणी

नायगाव :- नायगाव तालुक्यातील बरबडा येथे जुनी बाजार पेठ आहे म्हणून ओळखले जाते बरबडा येथील १० ते १२ हाजार लोकसंख्येचे मोठे गाव म्हणून ओळखले जाते बरबडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे व बरबडा येथे पाहिले ते बारावी पर्यंतचे माहाविद्यालय कॉलेज आहे बरबडा येथे नोकरी वर्ग आहे माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण खा . रविंद्र चव्हाण

खा .अजित गोपछेडे यांनी बरबडा येथे केंद्रीय वित्तमंत्री श्रीमती निर्मला सीतारामन यांचे कडे मागणी करण्यात यावेत अशी मागणी शेतकरी व व्यापारी कर्मचारी वर्गातून केली आहे बरबडा येथे बँक ऑफ इंडिया किंवा एस बी आय इतर कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेची नवीन शाखा तात्काळ सुरू करण्यात यावीअसे मागणी बरबडा व परिसरातील गावकऱ्यांनी केली आहे बँकेची सुविधा अपुरी असल्याने नागरिकांना सेवा मिळण्यात अडचणी येतात.नवीन बँक शाखेमुळे शेतकरी,व्यापारी व नोकरदारांना मोठा लाभ होईल आणि स्थानिक अर्थ चक्र गतिमान होईल अशी मागणी बरबडा येथील शेतकरी व व्यापारी वर्गानी व गावकऱ्यांनी केली आहे .

नायगाव तालुक्यातील बरबडा येथे जुनी बाजार पेठ आहे म्हणून ओळखले जाते बरबडा येथील १० ते १२ हाजार लोकसंख्येचे मोठे गाव म्हणून ओळखले जाते बरबडा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे